मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

मप्र

# हितगुज

अंक ६० ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● डिसेंबर २००४

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## अध्यक्षांचे आवाहन

कुलबंधू आणि भगिनींनो,

प्रतिष्ठानच्या कार्याशी मी सुरवातीपासून निगडित आहे. माझ्या स्वभावानुसार पडेल ते काम पडद्यामागे राहून करीत आलो; पडद्यापुढे येण्याचे कटाक्षाने टाळले. मात्र आता सहकाऱ्यांच्या अत्याग्रहाचा, खुषीच्या सक्तीचाच म्हणा ना - बळी झालो आणि कार्याध्यक्षपद स्वीकारले.

सर्वांच्या सहकार्याच्या आणि आशीर्वादाच्या बळावरच हे शिवधनुष्य पेलण्याची जबाबदारी मी घेतली आहे. प्रतिष्ठानचे कार्य विस्तारावे-बहरावे, प्रतिष्ठानला आर्थिक बळ प्राप्त व्हावे आणि त्याद्वारे कुलबांधवांच्या सर्वांगीण विकासाचे व उन्नतीचे कार्य प्रभावी व्हावे यासाठी आपण सर्व मिळून प्रयत्न करू या.

नुसती इच्छा असून पुरत नाही. यशस्वी होण्यासाठी गरज असते निश्चित उद्दिष्ट आणि कालबद्ध नियोजन यांची. पुढील २/३ वर्षांतील कार्याची आखणी करण्याच्या दृष्टीने आपणा सर्वांकडून सूचना, कल्पना हव्या आहेत.

प्रतिष्ठानने काय करावे, कसे करावे, कधी करावे याबाबत नि:संकोचपणे माझ्या पत्त्यावर त्वरित लिहावे. (तुमच्या प्रत्येक पत्राचे उत्तर मिळेल याची खात्री बाळगावी.)

''पांचामुखी परमेश्वर'' या न्यायाने जितकी जास्त पत्रे येतील तितक्या प्रमाणात माझा आत्मविश्वास वाढणार आहे. आपण मला नाउमेद करणार नाही अशी खात्री बाळगतो.

ठाणे, आपला सहकारेच्छू,
दि. २-१२-०४ **आनंद यशवंत मराठे**
कार्याध्यक्ष, मराठे प्रतिष्ठान

**निवास** : 'सुयश', विष्णूनगर, घंटाळी,
ठाणे ४०० ६०२.
फोन २५४२ ५५२४

**दुकान** : मे. यशवंत विठ्ठल मराठे प्रा. लि.,
कौपिनेश्वर मंदिर, स्टेशन रोड,
ठाणे ४०० ६०१.
फोन : २५३३ २२२४

***

## नवीन कार्यकारी मंडळ (२००४-०५ ते २००६-०७)

१० ऑक्टोबरच्या सभेत नवीन कार्यकारी मंडळाची निवडणूक झाली. त्यानंतरच्या १ल्या सभेत (२३ ऑक्टोबर) पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. नवीन कार्यकारी मंडळ पुढीलप्रमाणे :-

**पदाधिकारी**

१. कार्याध्यक्ष - आनंद यशवंत (पृ.२७७) ठाणे
२. कार्योपाध्यक्ष - रमाकांत माधव विद्वांस (पृ.६२३) माहीम, मुंबई
३. कार्यवाह - मोहन सदाशिव (पृ.३६५), खार
४. सहकार्यवाह - हेमंत अरुण (पृ.२१), नालासोपारा
५. कोषाध्यक्ष - प्रभाकर दामोदर (पृ.१२०), वडाळा
६. हितगुज संपादक - लक्ष्मण शंकर (पृ.५२०), मुलुंड

**सभासद**

१. विनायक केशव (पृ.२०), वरळी, मुंबई
२. सीताराम गोपाळ खांबेटे (पृ.६७६), अंधेरी, मुंबई
३. प्रमोद कृष्ण (पृ.३७६), ठाणे.
४. हेमंत महादेव (पृ.४७१), विलेपार्ले
५. चिंतामण महादेव (पृ.२२२), लालबाग, मुंबई
६. अदिती यशवंत (पृ.३९९), माहीम, मुंबई
७. पुष्कराज वामन (पृ.५०३), जोगेश्वरी, मुंबई
८. सुमेधा प्रभाकर (पृ.१२०), वडाळा, मुंबई
९. सौरभ सुरेश (पृ.८७), डोंबिवली, जि. ठाणे
१०. अरुण दत्तात्रय (पृ.६१), पुणे प्रतिनिधी

**कायम निमंत्रित**

११. यशवंत सुरेश (पृ.३९९), माहीम, मुंबई
१२. वामन गणेश (पृ.५०३), जोगेश्वरी, मुंबई
१३. अरविंद दामोदर (पृ.२९२), डोंबिवली
१४. सुरेश गोविंद (पृ.८७), डोंबिवली
१५. नीलांबरी रमेश (पृ.२८०), पुणे ***

## मराठे प्रतिष्ठान

पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२५. दूरध्वनी : २४३०२४५३.

# प्रतिष्ठान वृत्त

## कार्यकारी मंडळ सभा

प्रत्येक महिन्याच्या **दुसऱ्या शनिवारी** कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी सायंकाळी ५ वाजता कुलबांधव कार्यकारी मंडळाच्या भेटीसाठी येऊ शकतात.

मागील तिमाहीत सप्टेंबर ११, ऑक्टोबर ९ व २३ आणि नोव्हेंबर २० रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या. ९ ऑक्टोबरची सभा दुसऱ्या दिवशीच्या वार्षिक सभेच्या आधीची होती. या सभेला डॉ. राजेंद्र विठ्ठल आणि श्रीमती सुलभा सुरेश हे दोन विश्वस्त आवर्जून उपस्थित राहिले. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजाबद्दल तसेच नव्याने निवडावयाच्या कार्यकारी मंडळाबाबात सर्वसाधारण चर्चा या सभेत करण्यात आली. श्रीमती सुलभा सुरेश यांनी या सभेचे अध्यक्षस्थान भूषवले.

१०.१०.०४ च्या सभेत नवीन कार्यकारी मंडळाची निवडणूक झाली. त्यानंतर २३.१० रोजी जुन्या व नव्या कार्यकारी मंडळाच्या सदस्यांची संयुक्त सभा झाली. संस्थेचे विश्वस्त व नवीन कार्यकारी मंडळाचे सदस्य आनंद यशवंत या सभेच्या अध्यक्षस्थानी होते. या सभेत २००४-०५ ते २००६-०७ या तीन वर्षांसाठी पदाधिकाऱ्यांची निवड करण्यांत आली.

२० नोव्हेंबरच्या सभेत प्रतिष्ठानच्या भावी कार्याबाबत सविस्तर चर्चा झाली. विशेष म्हणजे पुणे कार्यकारिणीचे ७ सदस्य या सभेला उपस्थित होते.

गुणवत्ता पारितोषिके व प्रशस्तिपत्रे प्राप्त झाल्याबद्दल सुमारे १० विद्यार्थ्यांनी खास पत्रे पाठवून कृतज्ञता व्यक्त केली. तसेच अमरावतीच्या **गौरव व गिरीजा संजय** या भावंडांनी त्यांच्याजोगे काय काम आहे ते कळवण्याची विनंती केली, तर गोव्यातील एम.डी. झालेल्या **डॉ. विश्वनाथ सीताराम** याने त्याच्या बक्षिसाच्या रकमेत दुप्पट भर घालून रु. ७५१ ची देणगी शिक्षण निधीसाठी दिली. या गोष्टींची खास नोंद घेण्यात आली.

मुंबईत पारितोषिक वितरण समारंभाला गुणवान विद्यार्थ्यांची (ठाणे-मुंबईतल्या) उपस्थिती फारच कमी असते. अशी अनास्था का याबाबत चर्चा करून असे ठरविण्यात आले की यापुढे अशा विद्यार्थ्यांनी उपस्थित राहण्याबाबत सबळ कारण असल्यास तसे पत्र पाठवावे अथवा वार्षिक सभेच्या दिवशी जमत नसेल तर कार्यकारी मंडळाच्या मासिक सभेच्या दिवशी समक्ष येऊन पारितोषिक घेऊन जावे. गांवातल्या गांवांत पोस्टाने पारितोषिके रवाना करण्याचा प्रसंग आणू नये अशी अपेक्षा सभेत व्यक्त करण्यात आली.

उद्योग प्रवर्तनासंबंधी असे विचार व्यक्त करण्यात आले की उद्योजक कुलबांधवांना विविध प्रदर्शनात भाग घेण्याच्या दृष्टीने मदत/मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न करावा. पुण्यांत म. प्र. च्या अधिवेशनाच्या वेळी मांडलेल्या सर्व स्टॉलधारकांची छानच विक्री झाल्याचेहि सांगण्यात आले. तसेच प्रतिष्ठानमार्फत हॉस्पिटल/उत्पादक यांचेशी संपर्क साधून प्रतिष्ठानच्या सभासदांना त्यांच्याकडून काही सवलतीचे दर मिळवता येतील काय ते पहावे, असाहि विचार मांडण्यात आला.

कै. सुरेशभाऊ स्मृति निधी वाढवण्याच्या दृष्टीने कुलबांधवांप्रमाणेच इतर सर्वांसाठी तिकीट लावून सांस्कृतिक कार्यक्रम, उद्योग/व्यवसाय, मेळावे वा प्रदर्शने आयोजित करण्यात यावे असेहि विचार व्यक्त करण्यात आले.

हितगुज अधिक आकर्षक होण्याच्या दृष्टीने वैद्यकीय, क्रीडा, गिर्यारोहण/पर्यटन अशा विविध विषयांवर नावाजलेल्या जाणकार व्यक्तींकडून लेखन मिळवून ते हितगुजमध्ये छापावे असाहि विचार व्यक्त झाला.

> या अंकातील 'प्रतिष्ठान वृत्त' हे सदर शरद अरुण (पृ.२१), नालासोपारा, जि. ठाणे यांनी प्रायोजित केलेले आहे.

> ### आपली वेबसाईट
> आपण मराठे प्रतिष्ठानची वेबसाईट पाहिली काय? कृपया आपला अभिप्राय व काही सूचना असल्यास त्या जरूर कळवाव्या. आपल्या माहितीसाठी संकेतस्थळाचा संदर्भ : www.marathepratishthan.org

## वार्षिक सर्वसाधारण सभा

प्रतिष्ठानची २२वी वार्षिक सर्वसाधारण सभा १० ऑक्टोबर २००४ रोजी दादरमध्ये अखिल भारतीय कीर्तन संस्थेच्या सभागृहात झाली. अन्य नित्य व्यवहाराबरोबरच २००४-०५ ते २००६-०७ या कालावधीसाठी कार्यकारी मंडळाची निवड या सभेत करण्यात आली.

सभेनंतर ठाण्यातील ख्यातनाम लघुउद्योजक कुलबांधव मधुसूदन रामकृष्ण खांबेटे यांच्या हस्ते गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. सभेचा वृत्तान्त याच अंकांत स्वतंत्रपणे दिलेला आहे.

> ### अधिवेशनाची पूर्वसूचना
> प्रतिष्ठानचे पुढील अधिवेशन गोव्यांत ३० एप्रिल व १ मे २००५ रोजी घेण्याचे ठरत आहे. अधिकृत सूचना डिसेंबर अखेरपर्यंत येईल. मात्र या तारखा राखून ठेवाव्या म्हणून ही पूर्वसूचना.

## देणग्या

१.४.२००४ पासून सुरू झालेल्या नवीन वर्षात नोव्हेंबर २००४ अखेरपर्यंत प्रतिष्ठानच्या विविध निधींसाठी खालीलप्रमाणे देणग्या व अन्य रकमा प्राप्त झाल्या. -

| नांव/(पृष्ठ)/गांव | रक्कम (रु.) |
|---|---|
| **वैद्यकीय मदत निधी** | |
| हेमंत अरुण (पृ.२१), जि. ठाणे | १,००० |
| मोहन सदाशिव (पृ.३६५), खार, | ५,००० |
| सुमन वामन (पृ.१७), दादर, मुंबई | ५,००० |
| विनायक केशव (पृ.२०), वरळी, | १,००० |
| अरविंद दामोदर (पृ.२९२), डोंबिवली | १,००० |
| प्रमोद कृष्ण (पृ.३७६), ठाणे | ५०१ |
| शरद अरुण (पृ.२१), नालासोपारा | १,००० |
| रमाकांत माधव विद्वांस (पृ.६२३), माहीम, मुंबई | १,००० |
| सीताराम वासुदेव (पृ.२९७), देवळाली | २,००० |
| **शिक्षण निधी** | |
| प्रभाकर गणेश (पृ.६१), दादर, मुंबई | ५,००० |
| डॉ. विश्वनाथ सीताराम, बिंबल, गोवा | ७५१ |

चिंतामण महादेव (पृ.२२२), परळ ५०१
(पितृपंधरवड्यानिमित्त)

**हितगुज निधी**

अनिलकुमार द. जाईल (पृ.७५४), २२१
घाटकोपर, मुंबई
दत्तात्रेय आत्माराम (पृ.३२६), मुलुंड ५१
(भाऊबीजेनिमित्त)

**हितगुज जाहिराती**

प्रभाकर दामोदर (पृ.१२०), वडाळा १२००
(जून व सप्टेंबर ०४ अंकातील)
शरद अरुण (पृ.२१), नालासोपारा ५००
(प्रतिष्ठानवृत्त प्रायोजकत्व, डिसेंबर ०४)

### आजीव सभासद

१.४.२००४ पासून नोव्हेंबर २००४ अखेरपर्यंत खालील कुलबांधव प्रतिष्ठानचे आजीव सभासद झाले.

डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर (पृ.१२०), १००
वडाळा, मुंबई
सदाशिव वामन (पृ.५४८), गोवा १००

### सभासद संपर्क

सभासदांना आपापल्या गांवांतील कुलबांधवांशी संपर्क साधणे शक्य व्हावे. तसेच सभासद नसलेल्यांशी सभासद होण्याबाबत संपर्क साधता यावा या दृष्टीने या अंकापासून दोन-तीन अंकात क्रमाक्रमाने सभासदांची नांवे व पत्ते प्रसिद्ध करण्यांत येणार आहेत.

सभासदांनी आपले टेलिफोन क्रमांक आणि पत्त्यांतील बदल (असल्यास) **पोस्टकार्डाने** ल. शं. मराठे, अ-२३ सुयोग सोसायटी, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१ या पत्त्यावर **त्वरित कळवावे.** ***

### वैदिक शिक्षणासाठी पुरस्कार

वैदिक शिक्षण अथवा हिंदुधर्माचा प्रचार यासाठी शालिनी धुंडीराज प्रायोजित वार्षिक रु.१००० पुरस्कार प्रतिष्ठानतर्फे दिला जातो. यासाठी पात्र विद्यार्थी/कुलबांधवांनी शिक्षण अथवा धर्मप्रचार कार्याच्या तपशीलासह प्रतिष्ठानकडे अर्ज करावा.

# सभासद वृत्त

### मानसन्मान

**प्रमोद कृष्ण यांना पदोन्नती**

प्रतिष्ठानचे कार्यकारी मंडळ सदस्य **प्रमोद कृष्ण** (पृ३७६) भाभा अणुसंशोधन केंद्रातील सायंटिफिक ऑफिसर यांना नुकतीच 'डी' ग्रेडमधून 'ई' ग्रेड मधे पदोन्नती मिळाली. **मराठे परिवारातर्फे अभिनंदन!**

**तरुण संशोधिका - स्मृती जयंत विद्वांस**

पुण्यांतील अभियांत्रिकी व्यावसायिक **कै. जयंत पुरुषोत्तम विद्वांस** (पृ.६२३) यांची मुलगी **स्मृती** पी.एच्.डी. नंतरचे शिक्षण घेण्यासाठी १३ वर्षापूर्वी अमेरिकेतील सान्फ्रान्सिस्कोमधील कॅलिफोर्निया युनिव्हरसिटीत आली. तिथे तिने पी.एच.डी नंतर केलेल्या संशोधनामुळे टी.बी. ला प्रतिबंध करण्याच्या उपाययोजनांना नवी दिशा लाभणार आहे. या संशोधनाबद्दल अमेरिकेतील टेक्नॉलॉजी रिव्ह्यू मासिकाने तिचे नांव २००४ मधील १०० तरुण संशोधकांच्या यादीत समाविष्ट केले असून टेक्नॉलॉजी रिव्ह्यू मासिकाने सप्टेंबर २००४ मधे आयोजित केलेल्या टेक्नॉलॉजी रिव्ह्यू कॉन्फरन्समधे या संशोधनाबद्दल स्मृति विद्वांसचा खास सन्मान करण्यात आला.

### नांदा सौख्य भरे

१) मराठे प्रतिष्ठानचे अमेरिकावासी सभासद **अखिल जयंत विद्वांस (पृ.६२४) यांची बहीण स्मृती** हिचा विवाह डॉ. रोहित मोहन खरे यांच्याबरोबर रविवार दि. ४ जुलै २००४ ला, अमेरिकेतील डिकॅथलॉन क्लब येथे संपन्न झाला.

२) मुंबईतील सभासद **अरविंद रामचंद्र (पृ.२६९) यांचे सुपुत्र मंदार** यांचा विवाह चि. सौ. कां. रेवती (सखारामपंत पटवर्धन, सांगली यांची कनिष्ठ कन्या) हिच्याबरोबर रविवार दि. २८ नोव्हेंबर २००४ ला, सांगली येथील विष्णुकृपा मंगल कार्यालयात संपन्न झाला.

**सर्व नवविवाहितांचे**
**मराठे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन**

### इंजिनियरिंग शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

प्रतिष्ठानतर्फे इंजिनियरिंग शिक्षणासाठी खालीलप्रमाणे दोन शिष्यवृत्त्या देण्यांत येतात-

१. **कै. जगन्नाथ दामोदर शिष्यवृत्ती वार्षिक रु. २००** - ऑटोमोबाईल इंजिनियरिंग शिक्षणासाठी (पदवी, पदविका अथवा आय्.टी.आय्.)

२. **गणेश पारितोषिक वार्षिक रु. ५००** - १०वीत व्होकेशनल विषयात सर्वाधिक गुण अथवा १०वीला तांत्रिक विषय नसले तरी १०वी नंतर मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक अथवा कॉम्प्युटर इंजिनियरिंग यांसारखे अभियांत्रिकी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास.

मागील वर्षी व्होकेशनल विषय घेऊन १०वी झालेल्या अथवा चालू वर्षी संबंधित विद्याशाखेत शिक्षण घेणाऱ्या कुलबांधवांनी त्वरित अर्ज करावे.

### सहवेदना

१. इंदौर मधील सभासद **अनंत शंकर (पृ.३१८) यांची ज्येष्ठ भगिनी विमल दामोदर जोशी** हिचे ९.१०.२००४ रोजी निधन झाले.

२. गोव्यातील क्रियाशील सभासद **कालिदास बाळकृष्ण (पृ.५४१) यांची बहीण कमल वासुदेव ताम्हनकर** हिचे २० मे २००४ रोजी दु:खद निधन झाले.

३. मुलुंड, मुंबई येथील सभासद **प्रभाकर वासुदेव फडणीस, वय ७१ (पृ.२२७) यांची पत्नी सौ. शुभदा** ह्यांचे किडनीच्या विकाराने दि. १८ ऑगस्टला निधन झाले. संस्कृत प्रचाराच्या दृष्टीने ज्या ज्या ठिकाणी काम चालू असेल त्या त्या ठिकाणी त्यांचा सक्रीय सहभाग असे. तसेच संस्कार वर्गाहि, सहकाऱ्यांच्या मदतीने चालवीत. शुभदाबाई म्हणजे जुन्या नव्याचा संगम असे त्यांच्या शेजाऱ्यांना व नातेवाईकांना वाटे. जुन्या चालीरीती तसेच श्राद्ध पक्ष ह्या गोष्टींवर नितांत श्रद्धा असल्याने ते पाळण्याचा त्यांचा कटाक्ष असे. पण त्याचबरोबर २०व्या शतकातल्या आधुनिक रूढी-विचारांचाहि त्या खुल्या दिलाने स्वीकार करीत. ***

# वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तान्त (१० ऑक्टोबर २००४)

- **विनायक केशव** (पृ.२०), वरळी, मुंबई

मराठे प्रतिष्ठानची २२वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. १० ऑक्टोबर २००४ रोजी दादर येथे अखिल भारतीय कीर्तन संस्थेच्या सभागृही आयोजित करण्यात आली. सभेला ३१ सभासद उपस्थित होते. अरविंद दामोदर मराठे सभेच्या अध्यक्षस्थानी होते.

वृत्तांतसाली निधन पावलेल्या कुलबंधू भगिनींना श्रद्धांजली वाहून सभेच्या कामकाजाला सुरवात झाली. उपस्थितांचे मन:पूर्वक स्वागत करून अध्यक्षांनी पुढील विचार सभेपुढे मांडले.

''पोस्टखात्याला सभेची निमंत्रणे वेळेवर देऊनसुद्धा काही सभासदांना ती वेळेवर मिळाली नसल्याचा संभव आहे. या त्रुटीबद्दल मी प्रतिष्ठानतर्फे दिलगिरी व्यक्त करतो. मराठे परिवारातील प्रथितयश बांधवांची माहिती वार्षिक अहवालात सविस्तर दिलेली आहे. (अध्यक्षानी थोडक्यात या व्यक्तींच्या कामगिरीचा उल्लेख केला.) सांप्रत धकाधकीच्या काळात अनेक **सामाजिक व कौटुंबिक समस्या** निर्माण होतात. **याबाबतीत समुपदेशनाची अत्यंत आवश्यकता आहे.** मला अशा तऱ्हेचे काम करण्याची इच्छा आहे व **लवकरच मी हे कार्य सुरू करणार आहे.** परिवारातील मध्यमवयीन व प्रौढांनी हे काम स्वयंस्फूर्तीने करावे अशी माझी आग्रहाची विनंती आहे. तरुणांनी प्रतिष्ठानच्या कामामध्ये सहभागी व्हावे. कार्यबाहुल्यामुळे मला कार्यकारी मंडळाचे सदस्यत्व यापुढे स्वीकारता येणार नाही. सर्व कुलबांधवांनी मला दिलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.''

यानंतर कार्यवाह वि. के. मराठे यांनी सभेची नोटीस वाचून सभेच्या रीतसर कामाची सुरवात केली. २१व्या वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचून किरकोळ चर्चेनंतर सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

त्यानंतर २००३-०४ या कालावधीचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफातोटापत्रक सभेपुढे ठेवण्यात आले. वार्षिक सभेसाठी करण्यात आलेला खर्च वाढलेला आहे अशी प्रतिक्रिया व्यक्त झाल्यानंतर कोषाध्यक्षानी खुलासा केला की आता वार्षिक सभा भाड्याच्या हॉलमध्ये घेण्यात येतात. अल्पाहाराचे दरही वाढले आहेत. २१व्या सभेविषयी बोलायचे झाले तर सी. गो. खांबेटे व वा. ग. मराठे यांनी खर्चाचा बराच भार उचलला होता. त्याचा उल्लेख हिशेबपत्रकात आहे. चर्चेअंती वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफातोटापत्रक सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

इ. स. २००४-०५ या कालावधीसाठी प्रतिष्ठानचे हिशेबतपासनीस म्हणून चंद्रकांत वा. मराठे यांची रु. ७५० एवढ्या मानधनावर सर्वानुमते नेमणूक करण्यात आली.

त्यानंतर बदलत्या परिस्थितीला अनुसरून प्रतिष्ठानच्या घटना व नियमावलीत काही बदल कार्यकारी मंडळाच्या ठरावाद्वारे सुचविले होते. काही स्पष्टीकरणानंतर हे बदल सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

त्यानंतर २००४-०५ ते २००६-०७ या कालावधीसाठी प्रतिष्ठानच्या कार्यकारी मंडळाची निवड करण्यात आली. सर्व उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात नवीन कार्यकारी मंडळाचे स्वागत केले.

मधुकर खांबेटे या ज्येष्ठ कुलबंधूनी उद्योग व्यवसायाच्या बाबतीत मार्गदर्शन करण्याची तयारी दाखवली.

शरद मराठे (ठाणे) यांनी सभासदवाढीचे काम करण्याची इच्छा व्यक्त केली.

उपस्थितांचे आभार मानताना कार्यवाह वि. के. मराठे यांनी आपण गेली २२ वर्षे प्रतिष्ठानचे मनापासून काम केले. या कालावधीत कुलवृत्तांत तयार करण्याचे काम, कार्यविस्तारासाठी वि. गो. मराठे व इतर सहकारी यांच्याबरोबर बेळगांवपर्यंत काढलेले दौरे, कोषाध्यक्षांचे काम व गेली काही वर्षे कार्यवाह म्हणून केलेले काम यांचा समावेश होतो असे सांगून वयाची ७७ वर्षे पूर्ण केल्यामुळे कार्यवाहपदाची जबाबदारी दुसऱ्या सभासदाकडे द्यावी अशी इच्छा व्यक्त केली. कार्यवाह म्हणून काम करताना सर्व कुलबांधवांनी दिलेल्या मन:पूर्वक सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानले.

इतर कोणतेच काम शिल्लक नसल्यामुळे सभेचे काम पूर्ण झाले.

***

## 'जलतरण प्रबोधन'

### उदयोन्मुख जलतरणपटूंसाठी मार्गदर्शक पुस्तक

समीक्षक - **डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर** (पृ.१२०), वडाळा, मुंबई

'जलतरण-प्रबोधन' या पुस्तकांत जलतरणाची सामान्य माहिती, सुरक्षा नियम व बुडणाऱ्यास वाचविणे, पोहण्याचा तलाव आणि स्पर्धा, जलतरणशिक्षण, प्रशिक्षण आणि व्यायाम, स्वास्थ्य, आरोग्य आणि जलतरण या विषयांची सविस्तर माहिती दिली आहे.

संवादात्मक लिहिलेले पुस्तक हे या पुस्तकाचे वेगळेपण. त्यामुळे मुलांशी संवाद साधला जाऊन त्यांची जिज्ञासा पूर्ण करण्याचे काम ह्या पुस्तकाने केले आहे. तसेच जलतरणक्षेत्रात करिअर करणाऱ्यांना नोकरीच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत हेही पुस्तकात आवर्जून सांगितले आहे.

शिक्षणक्षेत्रात वीस वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असलेले **श्री. संजय रामचंद्र** (पृ.४१६) हे १९८२ पासून अमरावतीच्या श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या जलतरण विभागाचे प्रमुख आहेत. ४०च्या वर जलतरण प्रशिक्षण शिबिरांचे यशस्वी आयोजन त्यांनी केले आहे. राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील जलक्रीडा स्पर्धात पंच व तांत्रिकी अधिकारी म्हणूनहि त्यांनी कामगिरी बजावली आहे. ७५च्या वर राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धात पदक विजेते जलतरणपटू घडविण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

अशा तज्ञ व अधिकारी व्यक्तीचे हे पुस्तक, मराठे कुलबांधवांना निश्चितच उपयोगी होईल. त्यासाठी **संपर्क पत्ता** - श्री. संजय रामचंद्र मराठे, ओम.ओ.एम.एड., एम.पी.एड., डी.वाय.एड., एन.आय.एस. (जलतरण), राम दरबार, कुंभारवाडा, अमरावती ४४४६०१, फोन ०७२१-७३६१२

# मराठे प्रतिष्ठान गुणवत्ता पारितोषिके २००३-२००४

## अ. माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी)

| | नाव/(पृ.क्र.), गाव | गुण(%) | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १. | **ऋता संजय करमरकर** (५२०) बदलापूर (लक्ष्मण शंकर यांची नात) | ८८.५३ | ३०० +२५०★ |
| २. | **अदिती प्रदीप** (३४२ - प्रद्युम्न प्रभाकर यांची मुलगी), गोरेगांव, रायगड | ८६.६६ | ३०० |
| ३. | **सौरभ धनंजय** (३१६), पुणे | ८४.२६ | २५० |
| ४. | **श्रेयस शरदचंद्र** (३७०) ठाणे | ८४.२६ | २५० |
| ५. | **गिरिजा संजय** (४१६) अमरावती | ७३.२० | २५० |
| ६. | **वैभव राम** (३४० - राम कृष्णाजी यांचा मुलगा) गोरेगाव, रायगड | ८२.६६ | २५० |
| ७. | **प्रसाद भास्कर** (४५९) सांगली | ८२.४० | २५० |

## ब. उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (१२वी)

| | नाव/(पृ.क्र.), गाव | गुण(%) | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १. | **गौरव संजय** (४१६) अमरावती (सायन्स) | ९१.८३ | ४०० +२५०★ |
| २. | **प्रसाद विजय** (९६) पिंपरी, पुणे (सायन्स) | ८५.१७ | ३५० |
| ३. | **स्वानंद विश्वास** (४०) कुडाळ, सिंधुदुर्ग (सायन्स) | ८४.६७ | ३०० |
| ४. | **मनाली प्रसाद** (३४२) गोरेगांव, रायगड (सायन्स) | ८०.५० | ३०० |
| ५. | **दीपाली विवेक खांबेटे** (८६५) डोंबिवली, ठाणे (कॉमर्स) | ७७.५० | ३५० |
| ६. | **श्रद्धा राम** (३४० - राम कृष्णाजी यांची मुलगी) गोरेगांव, रायगड (कॉमर्स) | ७२.१७ | ३०० |
| ७. | **अनुप अशोक साठे** (६७० - दिनकर नीळकंठ खांबेटे यांची नात), बोरीवली (सायन्स) | ६२.५० | १५० |
| ८. | **प्राची पुरुषोत्तम** (५२१) गोवा (आर्ट्स्) | ६०.०० | २०० |

## क. पदवी व पदव्युत्तर परीक्षा

| | नाव/(पृ.क्र.), गाव | गुण(%) | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १. | **मधुरा प्रदीप** (३४२- प्रद्युम्न प्रभाकर यांची मुलगी), गोरेगांव, जि. रायगड, बी.एस.सी. | Distinction | ३५० |
| २. | **प्रज्ञा पुरुषोत्तम** (५२१) बिंबल, गोवा, बी.ए. | Distinction | ३५० |
| ३. | **अतुल अशोक साठे** बोरीवली, (६७० - दिनकर नीळकंठ खांबेटे यांच्या मुलीची मुलगी), बी.कॉम | First Class | ३०० |
| ४. | **रश्मी श्रीकांत काळे** (३२६ - दत्तात्रय आत्माराम यांच्या मुलीची मुलगी), बी.ई. | First Class | ३०० |
| ५. | **सौरभ सुरेश** (८७) डोंबिवली (प.), सी.ए. | ५३.३८ | २५० |
| ६. | **विश्वनाथ सीताराम** (५२०) बिंबल, गोवा, एम.डी. | | २५० |
| ७. | **निषाद गणेश जाईल** (७५८) कुर्ला, बी.कॉम. | First Class | ३०० |
| ८. | **रश्मी चंद्रकांत** (१००) ठाणे (प.), बी.कॉम. | First Class | ३०० |

## ड. स्कॉलरशिप परीक्षा (४थी)

| | नाव/(पृ.क्र.), गाव | गुण | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १. | **प्राची हेमंत** (२१) नालासोपारा | २६६/३०० | १५० +२५०★ |
| २. | **पार्थ कृष्णकांत मयेकर** (२९२), डोंबिवली (श्री. अरविंद दामोदर, माजी अध्यक्ष यांचा नातू) | २८८/३०० | |

## इ. स्कॉलरशिप परीक्षा (७वी)

| | नाव/(पृ.क्र.), गाव | गुण | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १. | **प्रगत प्रदीप** (३४२ - प्रद्युम्न प्रभाकर यांचा मुलगा) गोरेगांव, रायगड | २१८/३०० | १५० +२५०★ |
| २. | **अक्षय हेमंत परांजपे** (७३०) विलेपार्ले (वामन नारायण चक्रदेव यांच्या मुलीची मुलगी) | २१७/३०० | १५० |
| ३. | **शर्वरी शरद** (२१) नालासोपारा | १८२/३०० | १५० |

## फ. क्रीडा/कला परीक्षा/स्पर्धा

| | नाव/(पृ.क्र.), गाव | परीक्षा/स्पर्धा | गुण | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| १. | **केतकी अरुण कुलकर्णी** कोल्हापूर (४२७ - भालचंद्र कृष्ण यांची मुलगी) | कथ्थक नृत्य विशारद | ८१.५० | २५० |
| २. | **विराज मिलिंद** (३३१), डोंबिवली | अ) महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल संघटनेतर्फे आंतरजिल्हा राज्य स्पर्धेमध्ये सहभाग<br>ब) अखिल भारतीय नागरिक विकास केंद्रातर्फे, राज्यपातळीवरील ड्रॉईंग स्पर्धा<br>क) ऑल इंडिया चिल्ड्रेन्स आर्ट कॉम्पिटिशन, प. बंगाल | अे ग्रेड<br>सिल्व्हर मेडल | ४०० |
| ३. | **ऋचा मिलिंद** (३३१) डोंबिवली | अ) आंतरकॉलेज स्पर्धेत बास्केटबॉलमध्ये सहभाग<br>ब) महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल संघटनेतर्फे आंतर जिल्हा राज्य अजिंक्यपद स्पर्धेमध्ये सहभाग.<br>क) अश्वमेध स्पर्धा - ७वी महाराष्ट्र राज्य आंतर युनिव्हर्सिटी स्पोर्टस्मीटमध्ये बास्केटबॉलमध्ये सहभाग. टीमचा प्रमथम क्रमांक | | ३५० |

★ १०वी, १२वी व स्कॉलरशिप परीक्षेत मराठे परिवारांत सर्वाधिक गुण मिळवल्याबद्दल कै. कुमारी अमिता खांबेटे पारितोषिक.

# रामन राघवनची फाशी - न झालेली !

**- अच्युत महादेव चक्रदेव** (पृ.७३२), निवृत्त कारागृह निरीक्षक, पुणे

***(सकाळीच त्याला आणले. आल्याबरोबर त्याने आंघोळीची परवानगी मागितली. रामन राघवन एका दगडावर बसलेला व त्याच्या आजूबाजूला मी स्वतः व अन्य ४-५ रक्षक उभे होते. मला त्यावेळी राजा गोपीचंदच्या स्नानाची आठवण झाली. रक्षक सुवासिक तैलमर्दन करीत नव्हते, एवढाच फरक!)***

कारागृहामधील ही हकीगत आहे ज्याने एकेकाळी पूर्ण मुंबई 'गाजवली' होती, ज्याचा विषय घरी-दारी, कार्यालयांत, जिकडे तिकडे चर्चिला जात होता. भयाने, आश्चर्याने आणि अशाच काही संमिश्र भावनेने. ही व्यक्ती म्हणजे ज्याने संपूर्ण मुंबईची झोप उडवली होती तो रामन राघवन.

रामन राघवन तसा झोपडपट्टीत रहाणारा. त्याने एक विशिष्ट प्रकारचे हत्यार तयार केले होते व रात्रीच्या वेळी तो रस्त्यावर, पदपथावर, झोपडीचे बाहेर झोपलेल्या व्यक्तींच्या डोक्याच्या विशिष्ठ भागावर त्या शस्त्राने प्रहार करून त्याचा खून करून पसार व्हायचा.

असे बरेच खून झाले. पोलीस तपास जोरात चालू होता. जी माणसे बळी जायची ती आर्थिक दृष्ट्या अतिशय कनिष्ठ दर्जाची असायची. चोरीला जायचं सामान म्हणजे एखादे ॲल्युमिनियम भांडे, चमचा, कुठे पावाचा तुकडा तर कुठे आणखी काय. असलं काही तरी! म्हणजे पैशाच्या लोभानं हे खून होत आहेत असेहि दिसत नव्हते. त्यामुळे पोलीस चक्रावून गेले होते.

आणि अचानक कल्पना नसताना एके दिवशी खुन्याचा तपास लागला. यथावकाश खटला चालू झाला. खटला ऐकायला तुडुंब गर्दी होत असे. रामन राघवनला अनेक खुनांबद्दल फाशीची शिक्षा झाली आणि त्याला येरवडा मध्यवर्ती कारागृहात पाठवायचे ठरले. मी त्यावेळी येरवडा मध्यवर्ती कारागृहातच काम करीत होतो. फाशी झालेल्या कैद्यांचा विभाग माझ्याकडे होता. रामन राघवनची कीर्ती आमच्या कानावर होतीच. त्यामुळे तो आला त्यावेळी कडक बंदोबस्त होता.

सकाळीच त्याला आणले. आल्याबरोबर त्याने आंघोळीची परवानगी मागितली. रामन राघवन एका दगडावर बसलेला व त्याच्या आजूबाजूला मी स्वतः व अन्य ४-५ रक्षक उभे होते. मला त्यावेळी राजा गोपीचंदच्या स्नानाची आठवण झाली. रक्षक सुवासिक तैलमर्दन करीत नव्हते, एवढाच फरक! स्नानानंतर रामन राघवनने ऑर्डर सोडली. ''मुझे अभी खाना खानेका है.'' मग रक्षकाने त्याच्यासमोर थाळी ठेवली. तो म्हणाला, ''ये खाना मै नही खाऊंगा, ये सब लोगों के साथ तय्यार किया हुआ है. मुझे अलग खाना चाहिये. वो खास मेरे लिये तैयार करना चाहिये.''

रक्षक व अन्य अधिकारी बुचकळ्यांत पडले. आता नवीन जेवण तयार करायचे की काय? मग मी रामन राघवनची समजूत घातली व उद्यापासून निराळे जेवण देऊ म्हणून सांगितले. ते त्याने ऐकले. दुसऱ्या दिवसापासून मी सर्व जेवण एकत्रच तयार झाल्यावर कधी त्याला आधी तर कधी नंतर अशी व्यवस्था केली. त्याचे जेवण स्वतंत्रपणे करणे नियमानुसार शक्य नव्हते.

एकूण विचार केला तर त्याचं वागणं, बोलणं सगळंच चमत्कारिक होतं. सारखा स्वतःशीच पुटपुटत रहायचा. आम्हाला वाटायचं, फाशीमधून सुटण्यासाठी याचं हे ढोंग चाललय. पण बऱ्याच दिवसांच्या सतत निरीक्षणानंतर लक्षात आलं की खरंच तो अर्धवट आहे. आमच्या नित्याचे फेरीच्या वेळी मध्येच तो विनंती करायचा ''साहेब, मला परवा फाशी देऊन टाका.'' मी बरं बरं म्हणून पुढे निघून जायचो. अनेक देशी, परदेशी मानसोपचार तज्ञ येऊन त्याला भेटून गेले. नाना तऱ्हेचे प्रश्न विचारायचे. पण सगळ्यांनाच तो निरनिराळी उत्तरे द्यायचा.

अशा या चमत्कारिक व वेडसर वृत्तीच्या माणसाला स्वच्छतेची विलक्षण आवड होती. केरकचरा तो अजिबात होऊ देत नसे. फरशांच्या मधला भाग सुद्धा तो जुन्या ब्रशने साफ करून बसत असे. ह्या सगळ्या खुनांच्या मागे त्याची एक श्रद्धा होती.

त्याला त्याच्या म्हणण्याप्रमाणे एकूण १०० बळी कानून नावाच्या देवतेला अपर्ण करायचे होते. पोलीसांनी मध्येच पकडल्यामुळे शंभर बळी ही संख्या तो पूर्ण करू शकला नाही याबद्दल त्याला वाईट वाटत असे. त्याचं शरीर कमावलेलं होतं. मधेच केव्हातरी त्याला व्यायामाची लहर यायची आणि तो एकदम भरपूर व्यायाम करायचा. सहसा तो कोणाशीहि बोलायचा नाही. पण त्याचा दिनक्रम मात्र अगदी आखीव रेखीव असायचा.

दैवगती काय विचित्र आहे. असंतुलित मनःस्थिती असलेल्या व्यक्तीला फाशी देता येत नाही, तसा नियमच आहे. त्यासाठी त्याच्यावर मानसोपचार तज्ञाचे उपचारहि चालू होते.

वास्तविक एवढे एका पाठोपाठ त्याने निर्घृणरीत्या खून केले होते. त्याचं मरणहि ''करावं तसं भोगावं'' या म्हणीप्रमाणेच यायला हवं होतं..... तशीच सगळ्यांची अपेक्षा होती पण.....

रामन राघवनला मरण आलं ते अगदी शांतपणे! आजारी पडला म्हणून. अगदी नैसर्गिक मृत्यू झाला त्याचा! फाशी त्याला झालीच नाही!!

***

**आजोबा हरि प्रभाकर मराठे** *(१८८९ ते १९६३)*
**यांच्या स्मरणार्थ**

**प्रभाकर दामोदर मराठे,** वडाळा, मुंबई - ४०० ०३१.

**हितगुज वर्गणीदारांचे पत्ते** (आपापल्या गावातील हितगुज वर्गणीदारांशी संपर्क साधता यावा यासाठी या अंकापासून क्रमाक्रमाने पुढील दोन-तीन अंकात गांववार सभासदांची यादी देण्यात येत आहे. महाराष्ट्राबाहेरील हितगुज वर्गणीदारांचे पत्ते या अंकात दिले आहेत.)

## गोवा राज्य

२५६३/१८७/५५२
विश्वनाथ विठ्ठल मराठे
समर्थछाया, मु. बारभाट, पो. बांदिवडे,
फोंडा, **गोवा ४०३४०१.**

२८१०/४४१/५३१
अशोक शिवराम मराठे
मु. वेलिंग, पो. म्हार्दोळ, ता. फोंडा
**गोवा ४०३४०४.**

२७६३/३७०/५४१
गोविंद नारायण मराठे
डॉमनिक प्लाझा, २रा मजला, तिस्क-उसगांव,
फोंडा रोड, **गोवा - ४०३४०६.**

२७३७/६१९/५३१
अरुण शिवराम मराठे
''पुण्याई'', विश्वंभर नगर, ढवळी मळ,
मडगांव रोड, फोंडा, **गोवा ४०३४०१.**

२७२०/३१९/५३१
गजानन (सुदेश) शिवराम मराठे
मु. आंबेली, पो. गुळेली, ता. सत्तरी,
**गोवा ४०३५०५.**

२६७५/४३९/- - -
भालचंद्र कृष्णा मराठे
मु. आंबेली, पो. गुळेली, ता. सत्तरी,
**गोवा ४०३५०५.**

२७२३/३२२/५१५
देवू गोविंद (रामचंद्र) मराठे
मु. बिंबल, पो. खोतोडे,
ता. सत्तरी, **गोवा ४०३५०६.**

२७२९/३२८/५२२
रामचंद्र श्याम मराठे
मु. बिंबल, पो. खोतोडे,
ता. सत्तरी, **गोवा ४०३५०६.**

२७७८/४४०/५१५
पांडुरंग रामचंद्र मराठे
मु. धामसे, पो. खोतोडे,
ता. सत्तरी, **गोवा ४०३५०६.**

२७२२/३२१/५४३
मनोहर शंकर मराठे
मु. पो. खातोडे, ता. सत्तरी,
**गोवा ४०३५०६.**

२०६१/८२/५४१
कालिदास बाळकृष्ण मराठे
'श्री', मु. ढवळी, पो. कवळे, ता. फोंडा,
**गोवा ४०३४०१.**

२२४२/१८९/१८८
अशोक रामचंद्र मराठे
१८, गंगानगर, मल्ल्या अपार्टमेंट समोर,
कुर्टी-फोंडा, **गोवा - ४०३४०१.**

२७३६/३३३/५४८
वामन रामनाथ मराठे
मु. पो. धारबांदोडा, व्हाया उसगांव-तिस्क,
**गोवा - ४०३४०६.**

३२०६/८९३ /५४३
निलेंद्र दत्तोबा मराठे
घर क्र. ६४/१, तामासडो, व्हाया तिस्क,
**गोवा - ४०३४०६.**

२५६४/२५५/५३३
दिपक बाळकृष्ण मराठे
घर नं. १११६, भट वाडा, शिरोडा,
**गोवा ४०३१०३.**

२२३७/३३४/५४१
शशिकांत बाळकृष्ण मराठे
घर नं. ३४१, मातोश्री, विश्वंभर नगर,
ढवळी मळ, फोंडा, **गोवा - ४०३४०१.**

२७२१/३२०/५३१
पांडुरंग विष्णू मराठे
मु. आंबेली, पो. गुळेली, ता. सत्तरी,
**गोवा ४०३५०५.**

२२३३/२२४/५२०
सीताराम यशवंत मराठे
मु. बिंबल, पो. खातोडे, ता. सत्तरी,
**गोवा ४०३५०६.**

२७२४/३२३/५२१
पुरुषोत्तम विष्णू मराठे,
मु. बिंबल, पो. खोतोडे,
ता. सत्तरी, **गोवा ४०३५०६.**

२१४९/२२७/५१५
राजाराम रामचंद्र मराठे
मु. धामसे, पो. गुळेली, ता. सत्तरी,
**गोवा ४०३५०६.**

२२३५/२२६/५४३
लक्ष्मण पांडुरंग मराठे
मु. पो. खोतोडे, ता. सत्तरी,
**गोवा ४०३५०६.**

२७२८/३२७/५२१
सुदिन सदाशिव मराठे
मु. वेळगे, पो. वाळपाई, ता. सत्तरी,
**गोवा ४०३५०६.**

- - -/९५४/५४८
सदाशिव वामन मराठे
मु. पो. धारबांदोडा, व्हाया उसगांव-तिस्का,
**गोवा ४०३४०६.**

२७२६/३२५/५२१
प्रकाश विनायक मराठे,
मु. आंबेडे, पो. नगरगांव, ता. सत्तरी,
**गोवा ४०३५०६.**

२७२७/३२६/५२१
मधुकर नारायण मराठे
मु. भोंबेडे, पो. नगरगांव, ता. सत्तरी,
**गोवा ४०३५०६.**

२५८३/३२९/५४९
श्रीहरी वासुदेव मराठे
मु. चिरेव्हाळ, पो. होंडा,
ता. सत्तरी, **गोवा ४०३५०५.**

२७६४/३७१/५४९
राजाराम पांडुरंग मराठे
द्वारा-म्हपसा अर्बन को. ऑप. बँक, वेळगे,
**गोवा ४०३१०५.**

२२४१/१९८/२१८
रमेश त्र्यंबक मराठे
'सुरश्री', ९०५, वसंतनगर, सांखळी,
**गोवा ४०३५०५.**

४००८/४३८/५३४
विश्वनाथ लक्ष्मण मराठे
मु. कारापूर, पो. सांखळी, ता. सत्तरी,
**गोवा ४०३५०५.**

२८१९/४६७/५४२
मोरेश्वर हरी मराठे
'स्वप्न', तलावाजवळ, शिरसई, पो. थिवी,
**गोवा ४०३५०२.**

२७३५/३३२/५२१
नीळकंठ विष्णू मराठे
शारदा कॉलनी, प्लॉट नं. ३०, बोर्डे, डिचोली,
**गोवा ४०३५०४.**

२२४०/७०७/५३८
विश्वनाथ दत्ताराम मराठे
मु. देऊळवाडा-पाळी, व्हाया फोंडा,
**गोवा ४०३१०५.**

- - -/६२९/- - -
अशोक रामचंद्र मराठे
सेंट्रल लायब्ररी एम्लॉयी,
पणजी, **गोवा ४०३००१.**

२८११/४४२/५३८
शिवानंद दिवाकर मराठे
श्रीराम देवस्थान, कुंभारजुवे, पो. माशेल,
**गोवा ४०३१०७.**

- - -/६२२/५२१
सुमन परशुराम जोशी
द्वारा गजानन बर्वे, गांजे, पो. उसगांव, ता. फोंडा,
**गोवा ४०३४०७.**

२७३४/३३१/५४९
वसंत विष्णू मराठे
मु. चिरेव्हाळ, पो. होंडा, ता. सत्तरी,
**गोवा ४०३५०५.**

२७३३/३३०/५५२
गोविंद सदाशिव मराठे
मु. चिरेव्हाळ, पो. होंडा, ता. सत्तरी,
**गोवा ४०३५०५.**

२२८३/८१/६४५
प्रकाश गणेश विद्वांस
शिवम, म्युनिसिपल शाळेसमोर, मणिनगर (पूर्व),
**अहमदाबाद ३८०००८.**

३१६३/८४९/६४५
दिवाकर गणेश विद्वांस, ७ शैल्य अपार्टमेंट,
कॅडीला क्रॉसिंग, वाटवा रोड, घोडासार,
**अहमदाबाद ३८००५०.**

३१३४/८१७/६७४
डॉ. राजेंद्र श्रीकांत खांबेटे
४९/५०, नीलमणी सोसायटी, मेमनगर,
**अहमदाबाद ३८००२२.** (गुजरात)

३१३२/८१५/५३४
गणेश काशिनाथ मराठे
९६/५, सम्राट नगर, इसनपूर,
**अहमदाबाद ३८२४४३.** (गुजरात)

३१३१/८१४/३७४
प्रकाश प्रभाकर मराठे
सी/६०२, शगुन कॅसल वस्त्रपुरा, मानसी कॉम्प्लेक्स समोर,
अहमदाबाद ३८००१५. (गुजरात)

३१६२/८४८/६४५
माधव गणेश विद्वांस
३०, गुरु गोविंदबाग सोसायटी, मणिनगर,
**अहमदाबाद ३८०००८.** (गुजरात)

३१६१/८४७/६४५
अविनाश गणेश विद्वांस
२३ सागर अपार्टमेंट, डी-३५,मणिआसा, मणिनगर (पूर्व),
**अहमदाबाद ३८०००८.** (गुजरात)

३१३८/८२०/६७०
अलका दीपक फाटक, ६, शुभ आशिश अपार्टमेंट,
एस.बी.आय. युनिव्हर्सिटी कॅम्पस ब्रँच,
**अहमदाबाद ३८००१४.** (गुजरात)

३२०४/८९१/५३८
प्रदीप अनंत मराठे
२७६, वडमळ, मु. वेळगे-पाळी, ता. सत्तरी,
**गोवा ४०३१०५.**

२२३९/२२८/५२३
कृष्णा काशिनाथ मराठे
१३६९, हाऊसिंग बोर्ड कॉलनी, हरवळे,
**गोवा ४०३५०५.**

३२०३/६१६/५३८
मधुकर दिवाकर मराठे
वैभव, वसंत नगर, सांखळी, ता. सत्तरी,
**गोवा ४०३५०५.**

२२४५/१८८/५३८
परशुराम दिवाकर मराठे
रवळनाथ देवस्थान, मुळगांव, पो. अस्नोडा,
**गोवा ४०३५०३.**

## गुजरात राज्य

३१३५/८१८/६७२
किशोर रामचंद्र खांबेटे
३८, चंद्रलोक सोसायटी, कॅडीला लॅब रोड, घोडासार,
**अहमदाबाद ३८००५०.** (गुजरात)

३१३३/८१६/६४६
प्रभाकर त्र्यंबक विद्वांस
२४, हेमेंद्र पार्क सोसायटी, वाटवा रोड, ईसनपूर,
**अहमदाबाद ३८२४४३.** (गुजरात)

३११८/८०५/६७०
माणिक योगेश मिठ्ठनखेडीवाले
बी-३०२, अक्षरधाम टॉवर्स, शाही बाग,
अंडरब्रीज समोर, **अहमदाबाद ३८०००४.**

२६९०/७८८/५३३
अनंत शंकर मराठे
रविकिरण अपार्टमेंट, रंगमणी सोसा. समोर, मणिनगर (पू.),
**अहमदाबाद ३८०००८.** (गुजरात)

३१२९/८१२/१५८
नरेंद्र भास्कर मराठे
१९, जयरत्न बिल्डिंग, आर. व्ही. देसाई रोड,
**वडोदरा ३९०००१.** (गुजरात)

३११९/८०६/३८५
सतीश परशुराम मराठे
बळवंत, मराठे वाडा, शास, कोठीजवळ, चार दरवाजा,
रावपुरा, **वडोदरा ३९०००१.** (गुजरात)

३१२७/८१०/१५७
मोहन विष्णुपंत मराठे
१०२, श्रीमंगल अपार्टमेंट, मारीमाता लेन,
**वडोदरा ३९०००१.** (गुजरात).

३१२६/८०९/१५७
संदीप प्रमोद मराठे
२०३, अंबिका अपार्टमेंट, शंकर, दांडीया बाजार,
**वडोदरा ३९०००१.** (गुजरात)

३२०५/८९२/५३१
काशिनाथ कृष्णा मराठे
६३/पी-१०, विद्यानगर, खोर्ली, म्हापसा,
**गोवा ४०३५०७.**

२२४४/२२९/५३८
पांडुरंग दत्ताराम मराठे
दत्तकृपा, एम/५५, गोवा हाऊसिंग, आल्टो, बेती,
**गोवा ४०३५२१.**

२२४३/५८८/५५२
रामचंद्र सदाशिव मराठे
८५, पेडणेकरांचे घर, मारुती मंदिराजवळ, पणजी,
**गोवा ४०३००१.**

२२३८/४३७/५५९
प्रकाश रामचंद्र मराठे
३७४/१, पाळे, पो. गोवा-वेल्हा, ता. तिसवाडी,
**गोवा ४०३१०८.**

३१२५/८०८/२३१
उल्हास श्रीनारायण मराठे, ई-२/५७, मुल्हेरकर पागा,
माणिकराव आखाडा मार्ग, बाबाजीपुरा,
**वडोदरा ३९०००१.** (गुजरात)

१२०२/१७९/३४१
यशवंत महादेव मराठे
दर्पण अपार्टमेंटस्, ५, सविता, अलेम्बिक रोड,
**वडोदरा ३९०००३.** (गुजरात)

३१३०/८१३/३७४
अरुण प्रभाकर मराठे, २३/२३०, एम.आय.जी.
कॉलनी, जी.एच.बी. कॉलनी, मारुती धाम, मकरपुरा,
जी.आय.डी.सी, **वडोदरा ३९०००९.** (गुजरात)

२३८९/१६२/२७१
मधुसूदन अनंत मराठे
५४ बी, मणीनगर सोसायटी, बाजानिवास जवळ,
मांजलपूर, **वडोदरा ३९००११.** (गुजरात)

२२८८/१५०/०८१
गोविंद बळवंत मराठे
संतोष, कासार फलीया, रावपुरा, गव्हर्नमेंट प्रेससमोर,
**वडोदरा ३९०००१.** (गुजरात)

२२८५/४७२/४२२
रघुवीर विष्णुपंत मराठे
सुयोग, आनंदपुरा, रावपुरा,
**वडोदरा ३९०००१.** (गुजरात)

३१२८/८११/५२२
श्रीराम गजानन मराठे
नीलकंठेश्वर महादेव मंडी, दांडीया बाजार,
**वडोदरा ३९०००१.** (गुजरात)

३१२१/८०७/३८५
राजेंद्र सदाशिव मराठे
अन्नपूर्णा, मराठे वाडा, कोठी चौराहा,
रावपुरा, **वडोदरा ३९०००१.** (गुजरात)

२२२१/१५१/१७१
प्रभाकर गोविंद मराठे
प्लॉट नं. २४, फतेह गंज, सुवास कॉलनी,
**वडोदरा ३९०००२.** (गुजरात)

३२२७/९०९/६०७
विनोद कृष्ण मराठे
डी-१७०, राजदीप सोसायटी, पोलो ग्राऊंड समोर,
**वडोदरा ३९०००१.** (गुजरात)

३१५४/८३२/६७१
पुरुषोत्तम वासुदेव खांबेटे
६/२८, मल्हार गंज,
**इंदोर ४५२००२.** (म. प्र.)

३१५२/८३१/०२२
प्रभाकर दत्तात्रय मराठे
१७८ देवी आहिल्या मार्ग, जेल रोड,
**इंदोर ४५२००३.** (म. प्र.)

२३८०/४५१/२७४
विष्णू श्रीधर मराठे
१५७, टिळक पथ,
**इंदोर ४५२००४.** (म. प्र.)

३१४७/८२८/०२७
विजय सिद्धनाथ मराठे
२०२, रतन प्लाझा, ५६/२, नारायण बाग,
**इंदोर ४५२००४.** (म. प्र.)

३१४०/८२२/६७२
श्रीनिवास नारायण खांबेटे
४६, नारायण बाग,
**इंदोर ४५२००४.** (म. प्र.)

३१४८/८२९/३१८
अनंत शंकर मराठे
२१/बी, अन्नपूर्णा नगर, अन्नपूर्णा रोड,
**इंदोर ४५२००९.** (म. प्र.)

३१५७/८३५/६७०
शालिनी विलास सहस्त्रबुद्धे
१४०, पंढरीनाथ पथ, आडा बाजार, प्रज्ञानंदवास,
**इंदोर ४४०००६.** (म. प्र.)

३१४२/८२४/०८२
संजय प्रभाकर मराठे
१५/१, प्रभाकर, महावीर नगर,
**इंदोर ४५२००१.** (म. प्र.)

३१५५/८३३/२३४
अरविंद नारायण मराठे
२७७, लोकमान्य नगर,
**इंदोर ४५२००२.** (म. प्र.)

३१८१/८६४/३८९
गौरी किशोर गद्रे
अभिषेक, स्टेशन रोड, टिमार्णी,
**जि. हरदा ४६१२२८.** (म. प्र.)

२५३१/२०५/५१२
अरुण भिकाजी मराठे, अभिराम,
मणिनगरच्या मागे, किरण नगर जवळ, मांजलपूर,
**वडोदरा ३९००११.** (गुजरात)

३१२४/८४६/३७४
अनंत प्रभाकर मराठे
३७, गोकुल सोसायटी, वासना रोड,
**वडोदरा ३९००१५.** (गुजरात)

## मध्य प्रदेश

३१४४/८२६/६७०
शरद दिनकर खांबेटे
१४०, पंढरीनाथ मार्ग, आडा बाजार, प्रज्ञानंदवास,
**इंदोर ४५२००४.** (म. प्र.).

२४२७/८२७/०२९
श्रीकांत चिंतामण मराठे
२५, गणेश कॉलनी, रामबाग,
**इंदोर ४५२००४.** (म. प्र.)

३१३९/८२१/७५७
श्रीराम माधव जाईल
२०५, टिळक पथ, आपट्यांचे घर,
**इंदोर ४५२००४.** (म. प्र.)

३१४१/८२३/६७२
प्रकाश शंकर खांबेटे
२६/बी, चंद्रनगर कॉलनी,
**इंदोर ४५२००४.** (म. प्र.)

३१४३/८२५/०२५
नितीन भास्कर मराठे
शुक्लिया, २०६, सेक्टर ए, दीनदयाळ उपाध्याय नगर,
**इंदोर ४५२०१०.** (म. प्र.)

३१५६/८३४/६७०
रामचंद्र कृष्ण मराठे
१८७ डी, स्कीम ५१, संगम नगर जवळ,
**इंदोर ४४०००६.** (म. प्र.)

२८९८/५३८/२४०
मुकुल माधवराव मराठे
सेंट्रल बँक ऑफिसर्स ट्रेनिंग कॉलेज, ५१, आरारा हिल्स,
होशंगाबाद रोड, **भोपाळ ४६२००१.** (म. प्र.)

३२१७/८९९/७३९
सुधीर नारायण चक्रदेव
बी-१६, बँक ऑफ इंडिया ऑफिसर्स कॉलनी,
गौतम नगर, **भोपाळ ४६२००१.** (म. प्र.)

३२८६/९६१/०९६
सुधा लक्ष्मण मराठे
ई/२, १९२ अरेरा कॉलनी, महावीर नगर,
**भोपाळ ४६२०१६.** (म. प्र.)

## बिहार

३०१९/७२६/६०७
प्रभाकर काशीनाथ मराठे
महाराष्ट्र भवन, १०५, काल गच्ची, पंच महल्ला,
**गया ८२३००१.** (बिहार)

- - -/९८८/- - -
उल्हास बाळकृष्ण मराठे
डी/१२, अविनाश सोसायटी, हरणी रोड,
**वडोदरा ३९०००६.** (गुजरात)

३१५०/८३०/०२८
अनिल गोविंद मराठे
६२, उमेश नगर, अन्नपूर्णा रोड, पो. सुदामा नगर,
**इंदोर ४५२००१.** (म. प्र.)

२१२७/१७७/०९५
श्रीकृष्ण गणेश मराठे
६७४/एन/२, सी सेक्टर, गोविंदपूर, बीएचईल,
**भोपाळ ४६२०२३.** (म. प्र.).

३२६७/९३९/८२
श्रीपाद जनार्दन मराठे, वास्तुशुभा,
५०८, बी सेक्टर, सर्वधर्म कॉलनी, कोलार रोड,
**भोपाळ ४६२०४२.** (म. प्र.)

२९२३/५९५/२३०
कल्पना केशव कवडीकर
कवडीकर वाडा, रॉक्सी सिनेमाजवळ, लष्कर,
**ग्वाल्हेर ४७४००१.** (म. प्र.)

२८५३/५१८/२४०
सुशीलकुमार केशवराव मराठे
क्वार्टर ३६, टाईप ४, शास्त्रीनगर, थाटीपूर,
**ग्वाल्हेर ४७४०११.** (म. प्र.)

२९२१/५९३/२२६
अभय वसंत मराठे
गंगोत्री, सी-७/१९, ऋषीनगर,
**उज्जैन ४५६०१०.** (म. प्र.)

३१३७/८१९/६७०
सिंधू बळवंत बापट
राम मंदिर, नंदलाल रोड, हातोड,
**जि. इंदोर.** (म. प्र.)

३१६०/८४३/४४५
अरविंद (अनंत) गोविंद मराठे
ब्लॉक ४९/५०, चंद्रप्रस्थ, मोरार-६,
**ग्वाल्हेर** - ४७४००६. (म. प्र.)

३१५९/८४२/२४०
वामनराव रामचंद्र मराठे
५७४, सुरेश नगर, थाटीपूर,
**ग्वाल्हेर - ४७४०११.** (म. प्र.)

२९२२/५९४/२२६
अरुण वसंत मराठे
ए-२७/५, वेदनगर, नानखेरा, सावेर रोड,
**उज्जैन ४५६०१०.** (म. प्र.)

## पश्चिम बंगाल

२९५३/६३६/२८४
मालिनी श्रीपाद मराठे
१५६, शरत बोस रोड,
**कलकत्ता ७०००२९.** (प. बं.)

## कर्नाटक राज्य

२९१५/५८०/५३५
रविकिरण यशवंत मराठे
२८८२, खडे बाजार, मराठे चिल्ड्रेन्स हॉस्पिटल,
**बेळगांव ५९०००२.** (कर्नाटक)

२१२८/३७२/४७५
सदाशिव रघुनाथ मराठे, चार्टर्ड अकाऊन्टट,
१६२१, अणसूरकर गल्ली,
**बेळगांव ५९०००२.** (कर्नाटक)

२७४३/३४१/५४२
रघुनाथ महादेव मराठे
६४-बी, सोमवार पेठ, हायस्कूल जवळ,
टिळक वाडी, **बेळगांव ५९०००६.** (कर्नाटक)

२३९४/३३७/५३२
प्रा. नारायण कृष्ण मराठे
८२१, नेहरु रोड, ३रा मजला, भाग्यनगर,
ठळकवाडी, **बेळगांव ५९०००६.** (कर्नाटक)

२७४१/३३८/४७६
दत्तात्रय रामचंद्र मराठे
भानप कंपाऊंड, ७७७ खानापूर रोड, टिळक वाडी,
**बेळगांव ५९०००६.** (कर्नाटक)

२७३९/३३५/४७१
श्रीरंग दिवाकर मराठे
२३१, सुभाष गल्ली, अनगोळ,
**बेळगांव ५९०००७.** (कर्नाटक)

२३०१/१६८/४२७
हरी कृष्ण मराठे
महाराजा रेसिडन्स, एस.व्ही.आय. रोड, अनगोळ,
**बेळगांव ५९०००६.** (कर्नाटक)

२७४६/३४३/५२५
भास्कर नारायण मराठे
११०, भांदूर गल्ली,
**बेळगांव ५९०००२.** (कर्नाटक)

२९१४/५७९/५२५
श्याम यशवंत मराठे
१२९१ बी, रामलिंगखिंड गल्ली,
**बेळगांव ५९०००२.** (कर्नाटक)

२०९२/१६१/२८८
अरविंद महादेव मराठे, घर नं. ६/३/१११९,
बोले साबे, सपना नर्सिंग होमच्या मागे, बेगमपेट,
**हैद्राबाद ५०००१६.** (आं. प्र.)

३०३६/७४१/३१६
पराग अरविंद मराठे
१-१-७७३/८, दुसरा मजला, न्यू बकलम,
गांधीनगर, **हैद्राबाद ५०००८०.** (आं. प्र.)

२११५/१७/६९५
प्रभाकर रामकृष्ण खांबेटे
४०२, आश्रय अपार्टमेंट, रेलकल्याण जवळ,
मेट्टुगुडा, **सिकंदराबाद ५०००१७.** (आं. प्र.)

२७४७/३४४/५२५
विठ्ठल यशवंत मराठे
फ्लॅट नं. २, महाराजा अपार्टमेंट, एस. व्ही. रोड,
अनगोळ, **बेळगांव ५९०००६.** (कर्नाटक)

२५३२/३४०/५३८
श्रीपाद नारायण मराठे
२७५/ए-३, कडवेकर कंपाऊंड, टिळक वाडी,
**बेळगांव ५९०००६.** (कर्नाटक)

२९५२/६३५/४७६
उदय प्रभाकर मराठे
३१८, लक्ष्मी गल्ली, अनगोळ,
**बेळगांव ५९०००७.** (कर्नाटक)

२७४०/३३६/४७१
गजानन विष्णू मराठे
२३१, सुभाष गल्ली, अनगोळ,
**बेळगांव ५९०००७.** (कर्नाटक)

२७४५/३४२/५३५
यशवंत रामचंद्र मराठे
८४, ओल्ड पोष्ट ऑफिस रोड, कॅम्प,
**बेळगांव ५९०००१.** (कर्नाटक)

- - -/९९०/- - -
विजय प्रभाकर खांबेटे
रमा रेसिडन्सी, ब्लॉक १, फ्लॅट बी-३, नीपू साद्रा,
**बंगलोर - ५६००२५.** (कर्नाटक)

९९२१/३१७
सुलोचना रघुनाथ मराठे
फ्रॅग्रन्स नं. ५२, १ली क्रॉस, दिन्नूर, आर. टी. नगर,
**बंगलोर ५६००५५.** (कर्नाटक)

१२०६/१४/४५१
बळवंत दामोदर मराठे
२३, १८वी क्रॉस लेन, मल्लेश्वरम वेस्ट पी.ओ.,
**बंगलोर ५६००५५.** (कर्नाटक)

१२०७/१५/४५२
विनायक बळवंत मराठे
२३, १८वी क्रॉस लेन, पो. मल्लेश्वरम वेस्ट,
**बंगलोर ५६००५५.** (कर्नाटक)

## आंध्र प्रदेश

२४६१/२४८/२४६
सुधाकर श्रीकृष्ण मराठे
ए/१५, फॅकल्टी क्वार्टर्स, हैद्राबाद युनिव्हर्सिटी,
**हैद्राबाद ५००१३४.** (आं. प्र.)

३२८८/९६३/०००
नलिनी लक्ष्मण गोगटे, द्वारा कर्नल अनिल गोगटे
२-बी, जयपूर पॅलेस, पद्मावतियार रोड, ॲमिथेस्ट समोर,
गोपालपूरम, **चेन्नई ६०००१८.**

२६९४/२३०/५२०
गणेश (सुरेश) शंकर मराठे
गोवा सदन, १८, अमृता शेरगिल मार्ग,
**दिल्ली - ११०००३.**

२९९३/६९०/५७७
चक्रपाणी सखाराम मराठे
२८८/४, गांधी मैदान रोड,
**कारकल, ५७४१०४.** (कर्नाटक)

२९९९/६८९/५६९
रत्नाकर राम मराठे
कावेरी, राघवेंद्र मठाजवळ, तेल्लार रोड,
**कारकल, ५७४१०४.** (कर्नाटक)

२९६४/६८६/५८७
व्यंकटेश महादेव मराठे
अश्विनी हाऊस, मु. मळा, पो. मळा,
**ता. कारकल, ५७४१२३.** (कर्नाटक)

२९१२/५७७/५९४
डॉ. मुकुंद कृष्ण मराठे
तुकदार कृष्णा हॉस्पिटल, नारीगुडी रोड,
सिरसी, **जि. कन्नडा ५८१४०१.**

२९१३/५७८/५७७
अनंतकृष्ण सखाराम मराठे
पोष्ट ऑफिसजवळ, अनंतशयन रोड,
**कारकल, ५७४१०४.** (कर्नाटक)

३००२/६८७/५९१
वासुदेव कृष्ण मराठे
अनंतशयन मंदिरजवळ, गोमाता बेट्टा रोड,
**कारकल, ५७४१०४.** (कर्नाटक)

२९८६/६७९/५७०
नागभूषण गोविंद मराठे
अन्नपूर्णा मंदिर, मालेहिथ्लू, म. पो. दुर्ग,
**ता. कारकल, ५७४१२१.** (कर्नाटक)

२०६६/१६०/२८५
सदानंद कृष्णाजी मराठे
४, संपदा, विजयनगर,
**हुबळी ५८००३२.** (कर्नाटक)

## उत्तर प्रदेश

३१०६/७९४/७२८
विनायक वासुदेव चक्रदेव
११७/५४ क्यू, शारदा नगर, एल.आय.सी. सोसा.,
**कानपूर २०८०२५.** (उ. प्र.)

३१८३/८६६/२४१
राजीव वामनराव मराठे
ए-१५, रक्षापुरम, लाडपूर,
**डेहराडून २४८००८.**

३२८४/९५९/३४७
माधव रघुनाथ मराठे
४४, डोरीलाल,
**पिलिभिट २६२००१.** (उ. प्र.)

## प्रतिसाद

१. कु. प्रज्ञा, कु. प्राची यांच्या परीक्षेतल्या यशाबद्दल प्रतिष्ठानने केलेल्या कौतुकाने आम्हा सर्व कुटुंबीयांना आनंद झाला. प्रतिष्ठानची कार्यव्याप्ती वाढो व **पुढील पिढीला त्या कार्यात सहभागी व्हायची इच्छा होवो** ही परमेश्वरचरणी प्रार्थना.

**- सौ. अर्चना व पुरुषोत्तम विष्णू** (पृ.५२१), गोवा.

२. आम्ही १२वी आणि १०वीची परीक्षा चांगले गुण मिळवून पास झाल्याबद्दल आमचे अभिनंदन करून बक्षिसांचे पाठवलेले चेक आणि प्रमाणपत्रे मिळाली.

सध्या आम्ही दोघेही विद्यार्थी असल्याने **अभ्यासासोबत मराठे प्रतिष्ठानला कशा प्रकारे मदत करता येईल ते आपणच आम्हाला सुचवावे.** अमरावती मध्ये मराठ्यांची ३/४ कुटुंबे आहेत. आम्ही त्यांना भेटून मराठे प्रतिष्ठानचे सभासद होण्याकरिता जरूर विनंती करू.

आमचे बाबा **शारीरिक शिक्षण** विषयाचे प्राध्यापक आहेत. **योग आणि जलतरणाचे** ते तज्ञ आहेत तसेच **सेट, नेट परीक्षेकरिता** मार्गदर्शन करतात. आपल्या **ज्ञातीबांधवांना ह्या क्षेत्रांमध्ये ते केव्हाही मदत करतील.**

वार्षिक संमेलनाचे निश्चित झाल्यावर त्वरित कळवावे. सर्व वडील मंडळींना सा. न. आपले सर्वांचे आशीर्वाद आमच्या पाठीशी सदैव राहो ही विनंती.

आपले नम्र

१) **गौरव संजय** २) **गिरिजा संजय**

***

**Self Improvement**

Watch your ACTIONS :
They become your habits.
Watch your HABITS :
They become your character.
Watch your CHARACTER :
That becomes your KARMA.

# दिवाळीचा आगळावेगळा फराळ

**- गजानन भास्कर** (पृ.४२७), घाटकोपर, मुंबई

*('ग. भा.' प्रतिवर्षी मित्रमंडळींना असा 'वाङमयीन' फराळ पाठवतात. यंदा त्यांनी पाठवलेल्या फराळाच्या ताटातले हे दोन मासलेवाईक पदार्थ! - संपादक)*

१.

२५ वर्षापूर्वी मी निवडणूक अधिकारी म्हणून काम करीत होतो. दोन तरूण माझ्याकडे आले. त्यांनी चौपाटीवरील निवडणूक केंद्रात ड्युटी देण्याची विनंती केली. मी ती मान्य केली नंतर कळले की त्या केंद्राजवळच मुलींचे एक होस्टेल होते. त्या तरुणांना मतदारांच्या बोटांना शाई लावण्याचे काम होते. निवडणूक संपल्यावर मी गंमतीने त्यांना म्हणालो, ''काय तरुणींचा हात धरून शाई लावण्याची ड्युटी एन्जॉय केली की नाही?'' ते हिरमुसले आणि म्हणाले ''अहो, कसचे काय, त्या होस्टेलमध्ये राहणारी एक म्हातारी रेक्टर व एक सफाई कामगार एवढ्याच दोघी मतदान केंद्रात आल्या. हॉस्टेलमधल्या मुलींची नांवेच मतदान यादीत नव्हती.''

२.

माझ्या एका मित्राला पाठोपाठ पाच मुलगे झाले. पण त्यांना मुलगी हवी असल्यामुळे परत चान्स घेतला. त्यावेळी मात्र त्यांना कन्या रत्न झाले आणि कुटुंब विस्तार थांबला. अर्थात मोठ्या कुटुंबाची जबाबदारी पेलण्याची त्यांची ताकद होती. असे हे कन्येचे महत्त्व.

''अय्या, या एक व दोनच्या जमान्यात तुम्हाला पाच मुलगे व एक मुलगी, कमाल आहे हं!'' असे एक भगिनी म्हणाल्या. त्यावर मित्राचा प्रतिटोला, ''का ग बाई, तुला काही त्रास नाही ना? नाही म्हणजे तक्रार असायला हवी, तिची काहीच तक्रार नाही. उलट कन्या रत्न झाल्यामुळे आम्हाला खूप आनंद झाला आहे.'' त्यावर भगिनीचे तोंड बंद.

## 'वसुंधरेचा औषधी ठेवा'

### आरोग्याचा मंत्र नवा

**- सौ. पद्मजा मधुसूदन खांबेट** (पृ.६९६), ठाणे

आजच्या फास्ट युगात, फास्ट फूड खाऊन आला दिवस साजरा करण्याच्या जीवन शैलीमुळे पावलोपावली अनेक आजारांना तोंड द्यावे लागते. झटपट आराम मिळावा म्हणून स्ट्राँग औषधे, इंजक्शने यांचा मारा होतो. यामुळे तात्पुरती दुखणी दाबली जातात, नाहीशी होत नाहीत. ती पुन्हा पुन्हा डोकं वर काढतात. या चक्रव्यूहातून बाहेर पडण्यासाठी हे पुस्तक नक्कीच मार्गदर्शक ठरेल अर्थात हे प्रथमोपचार म्हणून करावे. बऱ्याच वेळा त्यामुळे बरे वाटेलच. परंतु काही निराळे वाटत असेल तर तज्ञांचा सल्ला घ्यावाच.

'वसुंधरेचा औषधी ठेवा' या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे घरात सहज उपलब्ध असलेले जिन्नस-धान्य, कडधान्य, मसाल्याचे पदार्थ, फळे, भाज्या, अंगण परिसरातील छोट्या मोठ्या वनस्पती व इतर आयुर्वेदिक सोपी औषधे यांचा उपयोग - कोणत्या आजारांवर काय उपयोगी त्याची एक सूची आहे व दुसरी सूची, एखादा जिन्नस असेल तर तो कोणकोणत्या आजारावर परिणामकारक आहे हे कळण्यासाठी उपयोगी आहे. आपल्या घरातीलच कितीतरी गोष्टी अशा आहेत की आपण आपल्यावर सहजोपचार करून ठणठणीत राहू शकतो, हे या पुस्तकातून कळते. ***

हसरे हितगुज

## बहुगुणी सल्ला

वरिष्ठांचा त्रास होऊ नये म्हणून रामभाऊंनी एक स्तोत्र म्हणण्याचा सल्ला आपले मित्र शामरावांना दिला होता.

बऱ्याच दिवसांनी दोघेजण भेटले 'शामराव आता तुम्ही रिटायर झालात! स्तोत्र म्हणण्याचे सोडले असेल' रामभाऊंनी विचारले.

'चांगला अनुभव आलेले स्तोत्र म्हणण्याचे मी कसे सोडेन? साहेबांच्या बाबतीत उपयोगी ठरलेले स्तोत्र आता घरात उपयोगी पडत आहे.' शामरावांनी उत्तर दिले.

**- विठ्ठल महादेव** (पृ.२३५), सांगली

# यशस्वी विवाहाची गुरुकिल्ली

- सौ. विद्या सुनील चक्रदेव (पृ.७३३), मुलुंड (पूर्व), मुंबई

*(अलिकडच्या काळात कुटुंबस्वास्थ्य टिकवण्यासाठी विवाहपूर्व मार्गदर्शन व समुपदेशन यांची गरज वाढत्या प्रमाणात भासते आहे. समुपदेशन केंद्राचा आराखडा मागील अंकांत दिला होता. सदर लेख त्याच विषयावर मार्गदर्शक ठरावा.*

*''निरपेक्ष प्रेम, सहानुभूती आणि त्याग या गोष्टी विवाहसंस्थेचा पाया असतो'' हे विचार पुस्तक-पांडित्य नसून लेखिकेच्या स्वानुभवाचे फलित आहेत आणि म्हणून ते अधिक मोलाचे आहेत. - संपादक)*

प्रत्येक स्त्री-पुरुषाची वैवाहिक जीवनाबद्दल काही स्वप्ने असतात. ती उराशी बाळगूनच ते आपलं घर वसवतात. असं म्हणतात की लग्नाच्या गाठी स्वर्गातच बांधल्या जातात. यातील कल्पनारम्यतेचा भाग सोडल्यास प्रत्येकाला 'लग्न' हे या पृथ्वीवरच यशस्वी करून दाखवावं लागतं. स्वत:च्या भावनांना मुरड घालून, वेळप्रसंगी सर्वस्वाचा त्याग करून केलेले विवाह देखील टिकतातच असं नाही. काही जोडपी त्यांना अपत्य असल्यास मुलांच्या भवितव्यासाठी, काही जण लोकलाजेसाठी शेवटपर्यंत विवाह टिकवून ठेवतात. तर काहींच्या विवाहाचा शेवट विभक्ततेत होतो.

सद्यकालात पाश्चात्त्यांचे अंधानुकरण म्हणा किंवा बदलत्या जीवनशैलीचा एक भाग म्हणा विवाहपद्धती व कुटुंबव्यवस्था पार ढासळली आहे. प्रत्येकाचे विश्व जरी वेगळे असले तरी फार अपेक्षा राखू नये. **योग्य जोडीदार मिळाला म्हणून विवाह यशस्वी होतो असं नाही, तर स्वत:ला देखील सुयोग्य जोडीदार व्हावं लागतं.** तरच विवाह टिकू शकतो. जीवनात कुणीच परिपूर्ण नसतं. प्रत्येकात काही ना काही कमतरता असतेच. म्हणूनच पति-पत्नीचं घर परस्पर सामंजस्य आणि तडजोडीतूनच उभं राहू शकतं.

'विवाह' हे एक दृढतेचे नाते आहे. ते अखंड ठेवण्यासाठी समजूतदारपणा, क्षमाशील वृत्ती, सहनशीलता व धैर्याची नितांत गरज असते. **प्रेमाचा अर्थ प्रेमापुरताच मर्यादित राहू द्यावा. त्यात हक्क नको नि अधिकार नको.** आपल्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी, आपला जोडीदार आपल्या मनाचा विश्रामस्थान व्हावा यासाठी, आपणही सहचराच्या भावनांची वेळोवेळी कदर केली पाहिजे. **केवळ शारीरिक आकर्षणावर लग्न टिकत नाही.** एकमेकांची काळजी वाहणे, **एकमेकांच्या सुखदु:खात, यशापयशात सामील होणं जास्त महत्त्वाचं असतं.**

**वैवाहिक जीवनाचा पायाच मुळी एकमेकांच्या विश्वासावर आधारित असतो.** तो विश्वास एकदा हरवला तर पुन्हा सांधता येत नाही. दुसऱ्या व्यक्तीबद्दलचा आदर विश्वासातून प्रगट होत असतो.

### *खुषीपत्र*

सप्टेंबर ०४ चा हितगुज अंक मिळाला. सौ. मंगला प्रवीण यांचा समुपदेशन कार्यक्रमाचा आराखडा उत्तम मार्गदर्शक असून अशी केंद्रे स्थापन करण्यास कार्यकर्ते पुढे येऊन त्याचा मराठे परिवारास लाभ मिळो ही सदिच्छा.

**- भास्कर नरहरी** (पृ.४६), रत्नागिरी

*[रत्नागिरीत समुपदेशन केंद्र स्थापनेबाबत, भास्करराव आपणच पुढाकार घ्यावा असे सुचवावेसे वाटते. आणखी काही कार्यकर्ते (त्यातील काही स्त्रिया) जमवून कृपया त्वरित कळवावे. - संपादक]*

आपला जोडीदार कारणाखेरीज वृथा दोषारोप करत असेल तेव्हा आपण सामंजस्याची भूमिका घेणे हितावह ठरेल. जीवनात कितीही अटीतटीचा प्रसंग येवो. परंतु काही जोडपी एकमेकांच्या सहकार्याने त्या प्रसंगांना सामोरे जातात. ती जोडपी समाजात 'आदर्श' म्हणून वाखाणली जातात. **कधी कधी छोटी-छोटी भांडणेही संसारात गोडवा निर्माण करतात.** दररोज गोड पदार्थांचा आस्वाद घेतल्यास कधीतरी इतर चवीही चाखून पाहण्याचा मोह हा होतोच. त्याचप्रमाणे छोटे छोटे वादविवादही जोडप्यात स्नेह वृद्धिंगत करण्यास कारण ठरतात.

**वास्तवतेचं भान राखणं** हे प्रत्येक जोडप्यासाठी महत्त्वाचं ठरेल. **आहे त्या स्थितीत जोडीदाराला स्वीकारणं, थोडक्यात 'पदरी पडलं नि पवित्र झालं' ही म्हण पुष्कळ अंशी सत्य आहे.** जोडीदाराकडून प्रत्येक वेळी प्रत्येक आशा पूर्ण होईलच असे नाही. हा विचार सदैव मनात ठेवूनच आजच्या नवतरुणांनी विवाहाच्या बोहल्यावर चढावे. याचकरिता 'सावधान' या शब्दाला वैवाहिक जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे.

हल्लीच्या धकाधकीच्या आयुष्यात पति-पत्नीला एकमेकांचा सहवास फार थोडा लाभतो. उभयतांनी मिळणारा अल्पसा वेळही भांडणात घालवला तर सहजीवनात कटुता उत्पन्न होते. आपल्या अवतीभवती कितीतरी बदल व घटना घडत असतात. त्यावर चर्चा करण्यासारखे पुष्कळ विषय त्यात असतात. जसे की, मुलांच्या प्रगतीबद्दल, नोकरी व्यवसायातले प्रश्न, कुटुंबातील इतर सभासद इत्यादी. **परस्पर संवादाने वातावरणातील ताण कमी करता येतो. लहानपणीच्या गोड आठवणींसाठी प्रत्येकानेच आपल्या मनाचा, हृदयाचा एक कोपरा कायम राखीव ठेवलेला असतो. पतीपत्नींनी त्या आनंदाची देवाणघेवाण आपसात करावी.**

प्रेमविवाह असो की ठरवून केलेला विवाह असो **प्रेम आंधळच असतं, विवाह मात्र डोळस असावा. भावी जोडप्याने विवाहापूर्वी**

एकमेकांना भेटून व्यवहारातील गोष्टींबद्दल **बोलले पाहिजे.** प्रसंगी कुटुंबातील ज्येष्ठ मंडळींची मदत घ्यावी. लग्नापूर्वी दोघांचे एकमेकांवर खूप प्रेम असते. पण विवाहानंतर मात्र एकमेकांचे दोष दिसायला लागतात. याचे कारण सत्य परिस्थितीची जाणीव होऊ लागते, नि दृष्टिकोन बदलतो. यासाठी जोडप्याने संसारसुखाला कायमचे पारखे होऊ नये याकरिता जोडीदाराच्या अपेक्षा, महत्त्वाकांक्षा, आवडी निवडी, त्याचे विचार, व्यक्तिमत्त्व या गोष्टींचा विचार काळजीपूर्वक करावा. कारण विवाहाचे सौख्य याच गोष्टीत सामावले आहे.

यदाकदाचित सर्व बाजूंनी प्रयत्न करूनही एखादा विवाह अयशस्वी झाल्यास विचारांच्या अंतिम टोकाला नशीब नावाची चीज असते, त्याचाच तो एक भाग मानावा. परंतु **निरपेक्ष प्रेम, सहानुभूती आणि त्याग या गोष्टींनीच विवाह संस्थेचा पाया भक्कम होत असतो, नि तोच विवाह यशस्वी ठरतो, ही जाण यशस्वी विवाहाची गुरुकिल्ली असते हे कधीहि विसरू नये.** ***

## मदतीसाठी आवाहन

श्रीगणेश वेदपाठशाळा, देवरुख, जि. रत्नागिरी या संस्थेत वेदशास्त्रोत्तेजक सभा, पुणे या संस्थेचे ५ वर्षे मुदतीचे याज्ञिकी व ऋग्वेद संहिता हे दोन अभ्यासक्रम शिकवले जातात. संस्थेत सध्या १८ विद्यार्थी निवासी पद्धतीने शिक्षण घेतात. निवास, भोजन, शिक्षण यासाठी शुल्क द्यावे लागत नाही.

संस्थेने ४००० चौ.फूट बांधकाम पूर्ण केले असून २५०० चौ.फूट बांधकामासाठी सुमारे ९ लाख रुपये, तसेच संस्थेच्या खर्चासाठी रु. २५ लाखाचा निधी उभारण्याचा संकल्प आहे. यासाठी आर्थिक सहाय्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष श्री. राजवाडे, कार्यवाह श्री. गानू आणि विश्वस्त श्री. भोपटकर यांनी केले आहे. संस्थेला दिलेल्या देणग्यांना आयकर कायदा कलम ८०जी नुसार सवलत मिळते.

कुलबांधवांनी याबाबत परस्पर संस्थेशी संपर्क करावा. पत्ता - **श्रीगणेश वेदपाठशाळा, वेदभवन, मु. पो. देवरुख,** ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी ४१५८०४ (फोन : ०२३५४-२४०८९४) ***

## "सासरची पाठवणी"

लेखक महाराष्ट्रभाषा चित्रमयूर कृष्णाजी नारायण आठल्ये, आठवी आवृत्ती, सन १९३४, किमंत १।। आणा या पुस्तकांतले हितगुजच्या वाचकांसाठी निवडक श्लोक.

प्रेषक - **चिंतामणी त्र्यंबक** (पृ.२४८), कळवा

शांती सोडुं नको, कधीं रुसुं नको, स्वच्छंद वागूं नको।
लज्जा सांडु नको, उगी बसुं नको, कोणास मागूं नको।।
रागे बोलुं नको, अढी धरुं नको, चोरून खाऊ नको।
कोठे जाऊ नको, परस्थ पुरुषांपाहून हासू नको।।
सर्वाआधी उठावे, स्मरण करुनिया मागुनी त्वां निजावें।
वस्त्रांपात्रां जपावे, कधिं न पुसल्यावीण बाहेर जावें।।
कामीं काजीं श्रमावे, आळस करुनियां त्वां न कोठे गमावें।
सद्ग्रंथाने रमावें, शयनिं पहुडतां, श्रीहरीते नमावे।।
वेणी बरी घालुनिया सकाळीं अत्यादरें कुंकुम लाव भाळीं।
मोठे नसावे टिकली नसावी, लोकांमधे सज्जनता दिसावी।।
किती घालिती कंचुकी फार तंग तसे तू नको दाखवूं रंग ढंग।
नको फार हव्यास गे भूषणांचा
धरी लोभ चित्तीं सदा सद्गुणांचा।।

***


# CENTREX INDIA

CONSULTANTS AND ENGINEERS

Designing - Engineering - Manufacturing - Consultancy - V. O. R. Plants.

Regd Office : 303, Brindaban II A, Off. Mahakali Caves Road, Poonam Nagar, Andheri (E), Mumbai - 400 093.
• Phone : (022) 839 1517 / 823 4142 • Mobile : 9820342618

**WE DESIGN MANUFACTURE ERECT & COMMISSION VEGETABLE OIL REFINING PLANTS**

(FROM 10M TONS TO 300M TONS PER DAY CAPACITY)

**FOR PROCESSING**

- INDIGENOUS & IMPORTED DEGUMMED SOYA BEAN OIL.
- CRUDE & WASHED COTTON SEED OIL.
- SUNFLOWER OIL
- MUSTER & RAPE SEED
- SUNFLOWER
- GROUND NUT
- RICE BRAN
- PALM OIL, PALM OLEIN
- MAHUWA OIL, MAIZE, WATER MELON

V. B. VIDWANS
SHIRISH BADGUJAR

# बारसें - अनंत धोंडो खांबेटे (पृ.६९८), शीव, मुंबई

*अलिकडे समाजांत संतती नियमनाचे महत्त्व पटल्यामुळे ''बारसें'' हा विधी विरळा! त्यामुळे ह्या विधीत अप्रूपता प्रत्ययास येते. दोन किंवा एकाच मुलावर संतती येऊन ठेपल्यामुळे नांवाला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले.*

ऑफिसांतल्या रामभाऊ जोश्यांना मुलगा झाल्यावर ''रामभाऊ! मुलाचे नांव काय ठेवणार?'' या प्रश्नांने त्यांना भंडावून सोडले. पण अशा अपेक्षित प्रश्नांचा अंदाज रामभाऊंनी अगोदरच हेरल्यामुळे, त्यांनी शेजारच्या बंडोपंत कर्णिकांना म्हटलं ''मी सध्या विष्णू सहस्त्रनाम वाचतोय. पूर्वीच्या गजानन, गणेश, पुरुषोत्तम, विष्णू, शंकर, अनंत, महादेव, वामन, विश्वनाथ इत्यादी नांवे कालबाह्य झाली.'' मग ''विष्णू सहस्त्रनामातलं कोणतं निवडलं?'' बंडोपंत कर्णिक.

''विष्णू सहस्त्रनामांतून निवड करता करता मी टेकीस आलो, बंडोपंत!! सरतेशेवटी 'क्षितीश' या ९९१व्या नावावर निवड पक्की केली. काय? कशी वाटते निवड?''

''वा! फारच सुरेख!! पण त्या मुलाला तरी त्याचं नांव नीटपणे उच्चारता आलं पाहिजे.'' बंडोपंताची नसती शंका.

वास्तवत: अलीकडे चुकीची पद्धत रूढ होतेय. अरुण, किरण ही पुल्लींगी नामे मुलींनाही उेवतात. उदा. अरुण व दीप ह्यांना काना जोडला की झालं. अरुणा व दीपा ही मुलींची नांवे सर्रास रूढ झाली. ''किरण'' हा तर पुल्लींगी शब्द पण तो किरण मुला व मुलींतही प्रकाशतो. पण भक्ती, पूजा, अर्चना, प्रतिक्षा, आरती, प्रभा इ. स्त्रीलिंगी सामान्यनामे चांगलीच स्त्री वर्गात प्रस्थापित झाली. स्त्रीलिंगी सामान्य नामाला काना न लावता दया पवार हा पुरुष लेखक प्रसिद्ध पावला.

भागिरथी, गंगा, यमुना, सिंधू, सरस्वती, नर्मदा, तापी, भीमा, कृष्णा, कावेरी इ. स्त्रियांची नांवे, उपरोक्त जुन्या पुरुषी नांवांप्रमाणे कालबाह्य ठरली. नक्षत्र हा सुरेख व सुंदरचा समानार्थी शब्द. म्हणूनच पूर्वाषाढा, उत्तराषाढांचा अपवाद करून, सर्व नक्षत्रांची नांवे स्त्रियांनी पटकावली होती. आता सर्व नक्षत्रे लोप पावली. 'अभिजित' नक्षत्र अलिकडे पुरुषांनी पादाक्रांत केले. जाई, जुई, चमेली, शेवंती, प्राजक्ता इ. फुलांनी स्त्रियांना भूषविले आहे. पण ही नांवे देखील नाविन्याच्या रेट्यापुढे फिकी पडत चालली आहेत. सोनिया, तनया, मोहना, मोनिका, मोनाली, कविता, कल्पिता, स्मिता, रिता इत्यादी नांवांचे पेव फुटले आहे. पुल्लिंगी शब्दांना काना जोडून स्त्री वर्गात एकेकाळची लोकप्रिय नांवे उदाहरणार्थ कृष्णा, शांता देखील आजकाल न आढळणारी.

जसजशी देवादिकांची मुलांची नांवे अस्त पावत चालली तसतशी नवीनवी नांवे उदा. विलास, विकास, विशाल, विक्रम, विनय, जय, विजय, भूपेंद्र, रविन्द्र, उपेन्द्रादी ''उदय'' पावली. तात्पर्य मनुष्य नाविन्याचा भुकेला असतो.

नाटक वा सिनेमांच्या संहितांचे नामकरण करताना गल्लाभरू दृष्टी ठेवतात. संहिताची नांवे मोहमयी, आकर्षक अशी कॅची असावी लागतात. उदाहरणार्थ, ''विच्छा माझी पुरी करा'', ''हात लावीन तेथे गुदगुल्या'', ''ठासून झालंच पाहिजे'', ''सोळा हजारात देखणी'', ''करायला गेलो एक, पण झालं जुळं'', ''बायको असून शेजारी'', ''नटरंगी नार'' इत्यादी इत्यादी लक्षणीय नांवे.

नावात काय आहे? असं जरी प्रख्यात आंग्ल कवी विल्यम शेक्सपिअरने म्हटलं असलं तरी, नावांतच सर्व काही दडलेलं असतं. न पेक्षा इलेक्टोरल रोल मध्ये, श्री. जॉर्ज फर्नांडीसने भर लोकसभेत म्हटल्यानुसार इंदिरा नेहरू गांधी अशी नोंद होती ना. फिरोझ गांधीशी विवाहबद्ध होण्याचा डाव सामान्य जनालाही कळल्याशिवाय कसा राहील. नेहरू आणि गांधी या लोकप्रिय आडनांवांचा राजकीय फायदा उठवायचा.

''आडनांवे'' ही वंशपरंपरागत चालत आलेली उपनामें. आडनांवांत देखील भरपूर विविधता व वैचित्र्य असते. कै. पु. भा. भावे यांचा आडनांवांवरील विस्तृत लेख मोठा चटकदार आहे. जिज्ञासूंनी तो अवश्य नजरेखाली घालावा, एवढेच सांगून माझं लांबलेलं हे 'नाम'देव पुराण पूर्ण करतो.

***

# किल्ले राजगड

**- हेमंत अरुण** (पृ.२१), नालासोपारा, जि. ठाणे

छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांपैकी 'राजगड' हा केवळ राजांचा गड नव्हे, तर गडांचाही राजा आहे. राजगडासारखा दुसरा किल्ला नाही. अत्यंत बळकट असा हा किल्ला छत्रपतींच्या उमलत्या स्वराज्याची राजधानी म्हणून होता. तसेच स्वराज्य आकाराला येतानाच्या अनेक गोष्टींना साक्षी होता. महाराजांचा राज्याभिषेक रायगडावर होऊन जरी रायगड राजधानी म्हणून निवडला तरी त्या अगोदरचा सर्व राज्यकारभार राजगडावरूनच होत असे. त्यामुळे हा जबरदस्त किल्ला तपशिलाने पहावा एवढा अद्वितीय आहे.

येथे जाण्यासाठी पुणे कोल्हापूर महामार्ग नसरापुरापाशी सोडून फाटा वेल्ह्याकडे वळतो. या परिसरातील अनेक गावांपैकी गुंजवणे गावातून चढून चोरदिंडीच्या बाजूने किल्ल्यावर पोहोचता येते. शिवाय वाजेघराकडून पाली दरवाजानेहि गडावर पोचता येते.

गडावर, मध्यभागी अद्वितीय, प्रचंड सुळक्यावर उभारलेला बाले किल्ला आणि उत्तर-पश्चिम-पूर्व अशा तिन्ही दिशांना अनुक्रमे पद्मावती-संजीवनी-सुवेळा अशा तीन माच्या असा राजगडाचा विस्तार आहे.

पद्मावती ही राजगडाची प्रमुख वस्ती. छत्रपतींच्या वाड्याचे आवार, पद्मावतीदेवीचे मंदिर, पद्मावती तलाव, दिवाणघर, घोड्याची पागा, अंबरखाना सदर, ढालकाठीची जागा इ. स्थळे या माचीवर आहेत.

बालेकिल्ल्यावर जननीचे मंदिर आहे. शिवाय अंदाजे ५० इमारतींचे अवशेष आहेत. वरून आजूबाजूचे बरेचसे किल्ले व डोंगरांनी वेढलेला प्रदेश दिसतो. असा हा राजगड याबद्दल वाचावे व लिहावे तसेच अनुभवावे तेवढे थोडेच!

सर्व आबालवृद्धांनी जरूर पहावा असा हा 'किल्ले राजगड'.

***

# मराठे प्रतिष्ठानला

*हार्दिक शुभेच्छा*









# शारदा ज्वेलर्स

**दिनेश वारा**

शॉप नं. १३ ए, तिसरा मजला, ३९/४३ अब्दुल रहमान स्ट्रीट,
जगदिश हॉटेल जवळ, पायधुणी, मुंबई - ४०० ००३.
फोन : २३४४ ५००९

॥श्री॥

विनम्र आवाहन

दि.१२-१२-०४

प्रति,
समस्त मराठे कुलबांधव यांस,

आपणांस माहित आहेच की, कै.श्री.सुरेशभाऊ मराठे यांनी त्यांच्या अन्य सहका-यांच्या मदतीने 'मराठे प्रतिष्ठान'ची स्थापना केली व आता त्यांच्या कार्याचा विस्तार होतो आहे. आपल्या प्रतिष्ठानतर्फे अनेक उपक्रमांचे आयोजन केले जाते.

कै.सुरेशभाऊ मराठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त दि.२७ फेब्रुवारी २००५ रोजी ठाणे येथे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. प्रतिष्ठान च्या स्थापनेमागे आपल्या कुलबांधवांच्या कला गुणांना वाव मिळावा ही कल्पना आहे. त्याला अनुसरुन या कार्यक्रमाच्या माध्यमातून आपल्यातील उदयोन्मुख व होतकरु कलावंतांना आपली कला सादर करता यावी आणि आपल्या परिवारातील ज्येष्ठ जाणत्या सदस्यांकडून त्यांचे कौतुक व्हावे व त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी वरील कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे.

तरीही आपल्यापैकी ज्यांना सदर कार्यक्रमात भाग घेऊन आपली कला सादर करायची असेल त्यांनी श्री.हेमंत अरुण मराठे दूरध्वनी (९५२५०-२४३३०३८ / ९५२५०-३०९२३६१) यांच्याकडे आपली नावे नोंदवावी. यामध्ये नृत्य, गायन, वादन आणि अन्य कलांचा समावेश आहे.

सदर कार्यक्रमाला कलावंतांचा तसेच आपल्या सर्वांचा उदंड प्रतिसाद मिळावा हे आमचे नम्र आवाहन आहे व आवाहन करतानाच आपल्या भरपूर प्रतिसादाची अपेक्षासुध्दा आहे.

(कार्यक्रमाचे ठिकाण आणि वेळ नंतर कळविण्यात येईल.)

## *अग्निपरीक्षा*

- श्रीमती स्वाती अभ्यंकर, पुणे

(विजय अनंत, पृ.१५५ यांची मुलगी)

बालपण आणि म्हातारपण
एक सकाळ, दुसरी संध्याकाळ
तारुण्याला म्हणावे का
रखरखीत मध्यान्हीचा काळ ?
बेरीज आणि वजाबाकी
गुणाकार आणि भागाकार
या चारही चिन्हांचा असतो
जीवनाशी निकटचा व्यापार
जो आला तो कधी ना कधी
जाणार हे नक्की असताना
कशाला करतो आपण अटीतटी
ईश्वराने त्याच्याच हाती ठेवल्यात
ह्या सर्व रुद्रगाठी

## *या अंकात*


१. **अध्यक्षांचे आवाहन**.......................... पृ.१
आनंद यशवंत मराठे, ठाणे

२. **नवीन कार्यकारी मंडळ** (२००४-०५ ते २००६-०७). पृ.१

३. **वार्षिक सर्व. सभेचा वृत्तान्त** (१० ऑक्टोबर २००४).. पृ.४
विनायक केशव मराठे, मुंबई

४. **जलतरण प्रबोधन (पुस्तक परिचय)**......... पृ.४
समीक्षक - डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे, मुंबई

५. **मराठे प्रतिष्ठान गुणवत्ता पारितोषिके २००३-०४** पृ.५

६. **रामन राघवनची फाशी - न झालेली !**...... पृ.६
अच्युत महादेव चक्रदेव, पुणे

७. **महाराष्ट्राबाहेरील हितगुज वर्गणीदारांचे पत्ते** पृ.७ ते १०

८. **यशस्वी विवाहाची गुरुकिल्ली**.............. पृ.११
सौ. विद्या सुनील चक्रदेव, मुलुंड, मुंबई

९. **सासरची पाठवणी (निवडक श्लोक)**....... पृ.१२
प्रेषक - चिंतामणी त्र्यंबक मराठे, कळवा, ठाणे

१०. **दिवाळीचा आगळावेगळा फराळ**............ पृ.१३
गजानन भास्कर मराठे, घाटकोपर

११. **वसुंधरेचा औषधी ठेवा (पुस्तक परिचय)**..... पृ.१३
सौ. पद्मजा मधुसूदन खांबेटे, ठाणे

१२. **बारसें**.................................. पृ.१४
अनंत धोंडो खांबेटे, शीव, मुंबई

१३. **किल्ले राजगड**.......................... पृ.१२
हेमंत अरुण मराठे, नालासोपारा, ठाणे

१४. **अग्निपरीक्षा (कविता)**..................... पृ.१६
श्रीमती स्वाती अभ्यंकर, पुणे


याशिवाय **प्रतिष्ठान वृत्त** (पृ.२), **सभासद वृत्त** (पृ.३), **खुषीपत्र** (पृ.११) आणि **हसरे हितगुज** (पृ.१३) **ही नेहमीची सदरे.**

**बुक पोस्ट**

प्रति


**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(टे. नं. ४३०२४५३)